cmyk

## संपादकीय

### बिहारी घोटाळे विद्यार्थ्यांच्या मुळावर

बिहार राजकीयदृष्ट्या अगदी सतर्क राज्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही सगळ्या देशाने ते पाहिले आहे. संपूर्ण परिवर्तनाची हाक या राज्यातूनच दिली गेली होती व त्यामुळे देशात सत्तांतर झाले होते. त्या परिवर्तनाच्या आंदोलनात अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील एक–दोन जण आज काळाच्या पडद्याआड गेले असतील. मात्र तेव्हाचे विद्यार्थी नेते आजही बिहारच नव्हे, तर देशाच्या केंद्रस्थानी आहेत. त्यातीलच एक प्रमुख नाव नितीश कुमार हे आहे. नितीश यांना आता 'बीपीएससी' अर्थात बिहार लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचे प्रकरण जबाबदारीने हाताळावे लागेल अन्यथा तो त्यांचा परतीचा मार्ग ठरू शकतो.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५३ | रविवार, दि.५ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# महाराष्ट्रात विमा योजनेकरिता ६९ हजार कोटींची तरतूद

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची माहिती

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**देशातील शेतकऱ्यांना कमी दरात खते मिळावीत यासाठी केंद्र सरकार काम करत आहे. शेतकऱ्यांना रास्त भावात खते मिळण्यासाठी ३ हजार ८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाल्यास भरपाईसाठी सॅटेलाइट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान पाहून कुणालाही मध्यस्थी न ठेवता शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम टाकली जाणार आहे. महाराष्ट्रात विमा योजनेकरिता ६९ हजार कोटींची तरतूद कॅबिनेट बैठकीत करण्यात आल्याचे केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले.**



कृषीमंत्री चौहान यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही नव्या वर्षानिमित्त शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथे सहकुटुंब शनिदर्शन घेतले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना चौहान म्हणाले, ''केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत असून सोयाबीनची खरेदी सुरूच राहणार तसेच कांदा निर्यात शुल्क रद्द केले आहे. शेतकऱ्याची सेवा हीच परमेश्वराची सेवा समजून मी कृषी खात्यामध्ये अमुलाग्र बदल करणार आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला आधारभूत ◀◀ पान २ वर

### गाड्यावरचा वडापाव तर रसवंतीत बसून रसपान

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोनई येथील कुसळकर वडापावच्या हातगाडीवर थांबून वडापाव व चटकदार भज्यांचे पार्सल घेतले तर सर्व परिवारासह वंजारवाडी येथील रसवंतीगृहातील उसाच्या रसाची चव चाखली. दोन्ही ठिकाणी पोलिस यंत्रणा व सर्व लवाजमा थांबल्याने सुरक्षेसाठी तैनात असलेल्यांची चांगलीच तारांबळ उडाली. कृषिमंत्र्यांचा साधेपणा लोकांना भावला. मराठा महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी दहातोंडे यांनी संत तुकाराम महाराज यांची पगडी घालून कृषिमंत्री चौहान यांचा सन्मान केला.

### सिध्दार्थ सोनवणेने दिले लोकेशन

मस्साजोग येथील आणि सरपंच संतोष देशमुख यांचा मित्र असलेल्या सिध्दार्थ सोनवणे यानेच देशमुख यांचे लोकेशन सुदर्शन घुले याला दिले असल्याची बाब उघड झाली असून संतोष देशमुख यांची हत्या झाल्यावर त्यांच्या अंत्यविधीलाही तो होता. पुढे तो तेथून पळून जाऊन कल्याणमध्ये लपला. तेथूनच त्याला अटक करण्यात आले आहे.

### हत्येतील तीन आरोपींचा भिवंडीत मुक्काम?

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जे तीन आरोपी फरार होते ते वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्यास होते. बीडमधील तिन्ही फरार आरोपी भिवंडीमध्ये दोन दिवस वास्तव्याला होते अशी माहिती मिळते. सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे दोन दिवस भिवंडीमध्ये होते. या तीन आरोपींपैकी दोन आरोपींना आता पोलिसांनी अटक केलेली आहे. सुदर्शन घुले हा टाकळीगावचा आरोपी आहे आणि तिथेच त्याचा एक लहानपणीचा मित्र भिवंडीमध्ये वास्तव्यास आहे, त्याच्याकडे ते काही दिवस गेलेले होते. दोन दिवस त्यांनी तिथे वास्तव्य केले होते, अशी माहिती आता समोर आलेली आहे. मात्र पोलिसांचे पथक ज्यावेळी भिवंडीमध्ये पोहोचले त्यावेळेला त्याच्या काही तास आधीच हे तिन्ही आरोपी तिथून फरार झालेले होते आणि त्यानंतर पुन्हा एकदा त्यांनी ठिकाण बदलले आणि काही दिवस लपले.

# सुदर्शन घुलेसह तिघांना १४ दिवसाची सीआयडी कोठडी

## वकिलाचा दावा: ना वाल्मिक कराड, ना सुदर्शन घुले, आकाचे नाव पहिल्यांदाच समोर



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुक हत्येप्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुणे येथून अटक केल्यावर शनिवारी त्यांना केज न्यायलयासमोर हजर केले. न्यायालयाने घुले, सांगळे यांच्यासह सिध्दार्थ सोनवणे यांना १४ दिवसाची सीआयडी कोठडी दिली आहे. तसेच या हत्येप्रकरणात आमदार सुरेश धस यांच्याकडून सारखाच आकाचा उल्लेख करण्यात येत आहे, या आकाबद्दल वकिलाकडून कोर्टात खळबळजनक दावा करण्यात आला आहे. ना वाल्मिक कराड ना सुदर्शन घुले, आकाचे नाव पहिल्यांदाच समोर आले असून ते वकिलाने कोर्टासमोरच सांगितले आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणावरून राज्यभरात वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणातील आणखी तीन आरोपींना अटक करण्यात आले आहे. ◀◀ पान २ वर

### आरोपींचे पुणे कनेक्शन कसे–खा. सुप्रिया सुळे



वाल्मिक कराड यांच्यासह इतर दोन आरोपी सुध्दा पुणे येथेच पोलिसांना सापडले असून आरोपींचे पुणे कनेक्शन नेमके कसे आहे? याचा शोध घेतला पाहिजे अशी प्रतिक्रिया खा. सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.



सुधीर सांगळे | सुदर्शन घुले

# ...तर आकाच्या आकानेही तुरुंगात जाण्याची तयारी करावी

## सुरेश धसांचा परभणीतील जाहीर सभेत इशारा

परभणी : सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना मकोको लागला पाहिजे. एकदा आत गेला की ५–६ वर्षे पुन्हा माघारी येत नाही. आका तर आता गेलाच पाहिजे. आकाच्या आकाने काही गडबड केली असेल तर तोपण आत गेला पाहिजे. छत्रपती संभाजीराजेंना ज्याप्रमाणे हालहाल करुन मारले त्याप्रमाणे संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. मी दोघांची तुलना करत नाही पण तो फक्त दलित समाजाची बाजूला घ्यायला होता. हा व्हिडीओ आकाला दाखवला होता. पण तो आकाच्या आकालादेखील दाखवला असेल तर आकाने तुरुंगात जायची तयारी करा, असा इशारा आ. सुरेश धस यांनी दिला आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सकाळी ११ वाजता जिंतूर रोडवरील नूतन महाविद्यालयाच्या मैदानावरून सर्वधर्मीयांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, बीडचे खा. बजरंग सोनवणे, ◀◀ पान २ वर

### अजितदादा क्या हुआ तेरा वादा...

आक्रोश मोर्चात बोलताना आ. सुरेश धस यांनी बरीच शेरोशायरी केली असून अजितदादा क्या हुआ तेरा वादा.. असे म्हणत अजित पवारांवरही हल्लाबोल केला.

# ..तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही

## मनोज जरांगे यांचा भरसभेत दिला गंभीर इशारा; घरात घुसून मारण्याचीही भाषा



**परभणी** : देशमुख कुटुंबाला धक्का जरी लागला तरी धनंजय मुंडे तुम्हाला महाराष्ट्राच्या रस्त्याने फिरु देणार नाही, असा गंभीर इशारा मनोज जरांगे यांनी परभणी येथील आक्रोश मोर्चात दिला. तसेच अलिकडून परभणी आहे, आणि पलीकडून धाराशिव आहे, यांच्या घरात घुसूनच मारु अशी भाषा सुध्दा जरांगे ◀◀ पान २ वर

### राज्यातले रस्ते कुणाच्या बापाचे नाहीत–सदावर्ते

मंत्री धनंजय मुंडे हे भटके विमुक्तांचे नेते असून ते मंत्री असताना त्यांना अशी धमकी देणे चुकीचे आहे. राज्यातले रस्ते काही कुणाच्या बापाचे आहेत का? अशा शब्दात अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांना सुनावले.

### मुख्य सुत्रधार धनंजय मुंडेच–नरेंद्र पाटील



संतोष देशमुख खून प्रकरणात धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला हवा, त्यांनी अगोदरच तशी भुमिका घ्यायला हवी होती, असे सांगून या प्रकरणात धनंजय मुंडे हेच मुख्य सुत्रधार असल्याचा आरोप नरेंद्र पाटील यांनी केला आहे.

### राहुल गांधींचा गोपनीय प्रवास उघड होणार;केंद्राचा मोठा निर्णय

नवी दिल्लीः लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची परदेश यात्रेची गोपनीयता संपणार आहे. ते कुठे प्रवास करतात, कोणासोबत प्रवास करतात आणि तिकीटासंबंधीची संपूर्ण माहिती सरकारकडे उपलब्ध असणार आहे. कारण, विमान कंपन्यांना आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे १९ प्रकारचे वैयक्तीक तपशील सरकारला देणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून सुरु होणार आहे.

परदेशात जाणारे प्रवासी कसे, कधी आणि कुठे प्रवास करत आहेत. कोणाच्या पैशावर प्रवास करत आहेत, अशा प्रकारची माहिती सरकारसोबत सामायिक करणे आवश्यक आहे. विमान कंपन्यांना ही माहिती देण्याचे निर्देश ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.४ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | ३,४५१ | ३,४५१ | ३,४५१ |
| ज्वारी/हायब्रिड : ४४.५० क्विंटल | २,७५१ | २,०७० | २,३५८ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,००० | ७,५८१ | ७,३४० |
| उडीद : १०.५० क्विंटल | ५,४०० | ६,९५० | ६,४०७ |
| बाजरी: ६.५० क्विंटल | ३,०२१ | ३,२५१ | ३,१५८ |
| मुग : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: ६५.०० क्विंटल | ४,०७१ | ४,१५१ | ४,१०६ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,३०० | ५,४०० | ४,८५० |

# राज्यात होणार १५ हजार शिक्षकांची भरती !

## शालेय शिक्षण विभागाकडून सरकारला प्रस्ताव, ३० जूनपूर्वी होणार प्रक्रिया



**मुंबई । प्रतिनिधी**

**शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागातर्फे खासगी अनुदानित व जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षक भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. एकूण रिक्तपदांपैकी ८० टक्के शिक्षकांची दुसऱ्या टप्प्यातील पदभरती ३० जूनपूर्वी केली जाणार आहे. त्यादृष्टीने शालेय शिक्षण विभागाने १४ ते १५ हजार शिक्षकांच्या भरतीसाठी परवानगी मागितली आहे. याबाबतचा प्रस्ताव सरकारकडे पाठविण्यात आला आहे.**

जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांची संख्या पुरेशी आवश्यक असून आगामी काळात सेमी इंग्रजीचे वर्ग देखील या शाळांमध्ये सुरू करण्याचे नियोजन आहे. दरम्यान, अनेक जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रोस्टरबद्दल तक्रारी होत्या. त्याची सुनावणी शिक्षण आयुक्तांकडे सुरू होत्या आणि आता त्यातील बहुतेक ◀◀ पान २ वर

# सुरेश धस यांना फडणवीसांचा आशीर्वाद

## संतोष देशमुख खून प्रकरण: संजय राऊत यांचे मोठे विधान



**मुंबई । प्रतिनिधी**

**बीडमधील प्रकरण योग्य दिशेने न्यायचे असेल, खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहोचायचं असेल तर सुरेश धस पुरेसे आहेत. सुरेश धस यांना देवेंद्र फडणवीसांचा आशीर्वाद आहे. सुरेश धस जे काही बोलत आहेत, ते देवेंद्र फडणवीस यांच्या आशिर्वादाशिवाय बोलणार नाहीत असा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. तसेच पोलिसांच्या तपासात बाधा येईल असे आता काही दिवस करु नये असे आवाहनही त्यांनी केले आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर विचारण्यात आलेल्या प्रश्नावर ते बोलत होते.**

बीडवर रोज प्रश्न विचारणे आता थांबवले पाहिजे. याप्रकरणी तपास सुरु असून, ते न्यायप्रविष्ठ आहे. ज्या दिवशी आपल्याला पोलिसांचा तपास योग्य दिशेने जात नाही असे वाटेल तेव्हा प्रश्न विचारले पाहिजेत. पोलिसांवर जनतेचा, विरोधी पक्षाचा दबाव आहे. पोलीस किंवा सीआयडीने आतापर्यंत केलेल्या कारवाईवर आपण विश्वास ठेवला पाहिजे. रोज उठून प्रश्न विचारत, पोलिसांच्या तपासात बाधा येईल असे आता काही दिवस करु नये, असे संजय राऊत म्हणाले आहेत. पुढे ते म्हणाले की, बीडमधील प्रकरण योग्य दिशेने न्यायचे असेल, खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहोचायचे असेल तर सुरेश धस पुरेसे आहेत. सुरेश धस यांना देवेंद्र फडणवीसांचा आशीर्वाद आहे. सुरेश धस जे काही बोलत आहेत, ते देवेंद्र फडणवीस यांच्या आशिर्वादाशिवाय बोलणार नाहीत. याचा अर्थ देवेंद्र फडणवीस यांनाही बीडमधील ◀◀ पान २ वर






cmyk

## अग्रलेख

# बिहारी घोटाळे विद्यार्थ्यांच्या मुळावर

बिहार राजकीयदृष्ट्या अगदी सतर्क राज्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही सगळ्या देशाने ते पाहिले आहे. संपूर्ण परिवर्तनाची हाक या राज्यातूनच दिली गेली होती व त्यामुळे देशात सत्तांतर झाले होते. त्या परिवर्तनाच्या आंदोलनात अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील एक-दोन जण आज काळाच्या पडद्याआड गेले असतील. मात्र तेव्हाचे विद्यार्थी नेते आजही बिहारच नव्हे, तर देशाच्या केंद्रस्थानी आहेत. त्यातीलच एक प्रमुख नाव नितीश कुमार हे आहे. नितीश यांना आता 'बीपीएससी' अर्थात बिहार लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचे प्रकरण जबाबदारीने हाताळावे लागेल अन्यथा तो त्यांचा परतीचा मार्ग ठरू शकतो. राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव, प्रशांत किशोर आदी मंडळींनी 'बीपीएससी' घोटाळ्यात उडी घेतली आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. बाहुबली खासदार अशी ओळख असलेले पप्पू यादवही रिंगणात उतरले आहेत. तिकडे मध्य प्रदेशात पेपर घोटाळ्याशी संबंधित विरोध करणार्या दोन युवकांना अटक झाल्याची बातमी आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याचा निषेध केला आहे. त्यांनी लोकसभेत आणि आताही समाजमाध्यमांद्वारे केंद्र सरकार आणि मध्य प्रदेश सरकारला लक्ष्य केले. काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांनीही दोनच दिवसांपूर्वी सरकारला 'बीपीएससी'च्या विषयावर कोंडीत पकडले आहे.

हजारांत एखादी गोष्ट घडली तर तो अपवाद मानला जाऊ शकतो. मात्र परीक्षांच्या बाबतीत पेपरफुटी हा प्रवाद झाला आहे. असंख्य जागा रिक्त असतानाही अलीकडे भर्तीची प्रक्रिया होत नसल्याचे वास्तव आहे. कोट्यवधी रोजगार उपलब्ध करून देण्याची गाजरे राजरोस दाखवली जात असली तरी भर्तीच्या नावाने अंधारच आहे. जागा रिक्त झाल्या किंवा असल्या तरी परीक्षा घेतल्या जात नाहीत. समजा परीक्षा झालीच तर ती वेळेवर होत नाही आणि वेळेवर झाली तर पेपर लीक होतो. या सगळ्याच्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला तर तो दाबला जातो. बिहारमध्ये लाठीमार झाला तर मध्य प्रदेशात अटकेपर्यंत प्रकरण गेले. देशात आणि राज्यांत कोणाचे सरकार आहे हा वास्तविक न लागू होणारा मुद्दा आहे. निवडणुकीच्या वेळी ज्यांना मोठी आश्वासने दिली जातात आणि ज्यांच्या भक्कम पाठबळावर निवडणुका जिंकल्या जातात त्या युवा वर्गाच्याच बाबतीत सरकारे अशी बेजबाबदार का होत आहेत? हे दुष्टचक्र कधी भेदले जाणार आहे का राजकीय साटेलोट्यात सगळाच बट्ट्याबोळ केला जाणार आहे? नियमितपणे घोटाळे होत आहेत. त्यामागे मोठे अर्थकारण आहे. लाखोंची बोली लागून पेपर फुटला जातो. सुरुवातीला पाच ते दहा लाखांत विकला जाणारा पेपर नंतर काही तसांतच हजार-पंधराशेला उपलब्ध होतो इतका त्याचा सर्वदूर खप झालेला असतो. सहा महिन्यांपूर्वीही मोठा गदारोळ 'नीट'च्या वेळी माजला होता. त्यावेळी केलेल्या तपासात त्याचे जाळे राजस्थानपासून महाराष्ट्रातील मराठवाड्यापर्यंत पसरले असल्याची माहिती उघड झाली. पेपर फुटीच्या या व्याधीमुळे किंवा अन्य गडबडींमुळे लायक उमेदवार डावलले जात आहेत. बरे ज्यांची निवड होते आहे त्यांच्यात जर गुणवत्ताच नसेल आणि ते मागच्या दाराने जर दाखल झाले असतील तर त्यातून समाजाचे काय भले साधले जाणार आहे? ही जी स्थिती सध्या परीक्षांच्या बाबतीत ओढावली आहे त्यामुळे तरूणांचा विश्वासघात तर होतोच आहे, मात्र लोकशाही प्रणालीही सडते आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचे रक्षण करणार कोण याचे उत्तर देणाराही कोणी नाही. केवळ बिहार आणि मध्य प्रदेशच नाही तर गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड अशा बहुतेक राज्यांत पेपर लीक झाल्यामुळे परीक्षा एकतर रद्द केली गेली आहे किंवा पुढे ढकलली गेली. या संघटित गुन्हेगारीत कोचिंग क्लासेसची भूमिका महत्त्वाची असल्याचेही तपासात समोर आले आहे. त्यांच्याकडे लाखो रुपये खर्च करून येणारे विद्यार्थी त्यांच्या या व्यापारात भांडवल म्हणून त्यांना उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांकडून अगोदर फी म्हणून आणि नंतर पेपरसाठी केलेली वसुली पेपर लीक माफियांपर्यंत पोहोचते अशी साखळी असल्याचेही निष्पन्न झाले आहे. काय होते आहे, कसे होते आहे आणि काय केले पाहिजे व कसे रोखले पाहिजे या सगळ्याची यंत्रणेला कल्पना आहे. मात्र ते होत का नाही हाच कळीचा मुद्दा आहे. सातत्याने एक देशालाच अंधारात लोटणारा गंभीर गुन्हा होत असताना यावर एकही जबाबदार नेता अथवा मंत्री अथवा सर्वोच्च नेत्याने तोंडातून अवाक्षरही काढले नाही. हे कशाचे द्योतक आहे? आपल्याला हेच हवे आहे का?



## लाल परीचा अखंडीत प्रवास

**" लाल परी" ही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कडून चालवलेली एक ऐतिहासिक आणि प्रसिद्ध बस सेवा आहे. या बसला "लाल परी" हे नाव दिले गेले आहे कारण ती लाल रंगात रंगवलेली असते. १९६० च्या दशकात ही सेवा सुरू झाली आणि त्या काळात प्रवासाच्या सुविधा आणि आरामदायक अनुभवासाठी ती ओळखली जाऊ लागली. विशेषतः पुणे आणि मुंबई दरम्यानच्या प्रवासासाठी लाल परी बस सेवा एक महत्त्वाची भूमिका बजावत आहे.**

लाल परी बस सेवा प्रवाशांना आरामदायक आणि जलद प्रवासाची सुविधा पुरवते. या बस सेवेत आधुनिक आणि आरामदायक सुविधांचा समावेश आहे. वातानुकूलित बस, आरामदायक सीट्स, आणि - सारख्या सुविधांमुळे प्रवाशांना आरामदायक आणि सुखद प्रवासाचा अनुभव मिळतो. पुणे-मुंबई मार्गावर लाल परी सेवा सर्वसामान्य लोकांसाठी एक अवलंबनीय पर्याय बनली आहे, कारण ती त्यांच्या दैनंदिन प्रवासाची सोय करते. या बसने प्रवास करणाऱ्यांना एक विश्वासार्ह, सुरक्षित आणि आरामदायक पर्याय दिला आहे. लाल परी बस ही सार्वजनिक परिवहन क्षेत्रात एक प्रतीक बनली आहे. ती केवळ एक बस सेवा नसून, ती महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक सेवेच्या विकासाचे आणि सुधारणा करण्याचे एक उदाहरण आहे. कालांतराने, ने या बस सेवेतील वेळापत्रक आणि सुविधांमध्ये सुधारणा केली, जेणेकरून प्रवाशांचा अनुभव अधिक चांगला होईल. लाल परी सेवा आजही त्याच्या ऐतिहासिक परंपरेला जपताना, आधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधांचा वापर करून प्रवाशांना सर्वोत्तम सेवा देत आहे. शेवटी, लाल परी केवळ एक प्रवासाच्या साधनाचा पर्याय नाही, तर ती महाराष्ट्राच्या प्रवास संस्कृतीचे प्रतीक बनली आहे. तिच्या लोकप्रियतेमुळे ती आजही प्रवाशांच्या मनात एक खास स्थान राखते. तिचा वापर करणारे प्रवासी तिच्या आरामदायक प्रवासाची प्रशंसा करतात, आणि ती च्या गुणवत्ता आणि प्रवासातील सुधारणा दर्शवते. "लाल परी" ही सार्वजनिक परिवहन सेवा असलेली एक आदर्श बस सेवा बनली आहे, जी पुढेही प्रवाशांना विश्वास आणि आरामदायक अनुभव देत राहील.

# युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचे १० ते १२ जानेवारी दरम्यान आयोजन

## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**विश्वास, विकास आणि विनम्रता या त्रिसुत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अंबाजोगाईकरांनी व बँकेच्या सर्व सभासदांनी नियोजित वेळेत उपस्थित राहून व्याख्यानमालेचा सहकुटूंब, सहपरिवार लाभ घ्यावा असे नम्र आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.**

याबाबत बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी सांगितले की, दीनदयाळ बँकेने ३१ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत उत्तम टीमवर्क करून ५२२ कोटी रूपयांच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. तर एकूण व्यवसायाचा ८५३ कोटींचा पल्ला ही गाठला आहे. लवकरच ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंत १००० कोटी रूपयांच्या व्यवसायाचे लक्ष्य बँकेने समोर ठेवले आहे. लवकरच ते ही साध्य होईल. आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असताना सामाजिक उत्तरदायित्व व जबाबदारीचे भान ठेवून समाजाचे आपण काही देणे लागतो. याच जाणिवेने अंबाजोगाईकरांना मागील २२ वर्षांपासून व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक मेजवानी देण्याचे काम दीनदयाळ नागरी सहकारी बँक अव्याहतपणे करीत आहे. या उपक्रमाचे हे २३ वे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत आजपावेतो सदर व्याख्यानमालेत अनेक थोर विचारवंत, कलावंत, लेखक, साहित्यिक, पत्रकार, अर्थतज्ज्ञ, इतिहास संशोधक, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडलेले आहेत. यावर्षी ही युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त १० ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान दररोज सायंकाळी ६.३० वाजता (तीनही दिवस) खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, कुत्तर विहिर, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित व्याख्यानमालेसाठी शुक्रवार, दि.१० जानेवारी रोजी प्रा.अभय भंडारी (विटा, जि.सातारा) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा विषय स्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवाद असा आहे. भंडारी हे प्रसिद्ध व्याख्याते आहेत. आजपावेतो त्यांनी विविध ठिकाणी व्याख्याने दिली आहेत. ते अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ही सर्वत्र ओळखले जातात. तसेच शनिवार, दि.११ जानेवारी रोजी प्रकाश पाठक (चार्टर्ड अकौन्टटस, धुळे) यांचे 'पंचप्रण - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर व्याख्यान होईल. पाठक हे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील जाणकार व्यक्तीमत्व म्हणून ही सर्वदूर ओळखले जातात. ते आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत आहेत. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी सहकार भारती स्थापना दिवस ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला - २०२५ चा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालिका तसेच महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या विभागाच्या कॅबिनेट मंत्री ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, संचालक श्री.रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षिरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर तसेच सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद यांनी बँकेच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अंबाजोगाई



ॲड.मकरंद पत्की (अध्यक्ष)



ॲड.राजेश्वर देशमुख (उपाध्यक्ष)

## दिंद्रूडच्या आठवडी बाजारात भाजीपाल्याचे भाव कोसळले, शेवगा शिखरावर!

**दिंद्रूड । प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून वाढलेले भाज्यांचे भाव अचानक घसरले आहेत. थंडीमुळे भाजीपाल्याची आवक वाढली आहे, त्यामुळे भाजीपाल्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. आठवडी बाजारात सर्व प्रकारच्या भाज्या मातीमोल किंमतीत विकल्या जात आहेत त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. तर घरखर्चाचे बजेट सांभाळणाऱ्या गृहिणी मात्र खुश आहेत. शेवगा अजूनही ३०० रुपये प्रतिकिलो विकला जात असून अनेक हॉटेल, धाबे व घरातून तो गायब झाला आहे.**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड येथे शेकडो वर्षापासून मोठा आठवडी बाजार भरतो. जवळपास वीस ते पंचवीस खेड्यातील नागरिक येथे बाजारासाठी नियमित येतात. पंचक्रोशीत शेतमजूर व कामगारांची संख्या लक्षणीय असल्यामुळे व्यापाऱ्यांची या बाजाराला पसंती असते. रविवारच्या आठवडी बाजारात भाजीपाल्यांची आवक वाढल्याने किमतीमध्ये मोठी घसरण झालेली पहायला मिळाली.

## तुलसी शैक्षणिक समूहात एकपात्री नाट्यातून सवित्रीमाईंचे जीवनदर्शन

### विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ५ महिलांचा सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

**येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी शैक्षणिक समूह, बीड.च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त शनिवार दि.४ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वा.तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड. येथे महाविद्यालयाच्या प्रांगणात "स्त्री सन्मान सोहळा व मी सावित्री बोलतेय" या एकपात्री विचारनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष,मा. प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शक व एकपात्री नाट्याच्या सादरकर्त्या एस.एन.डी.टी.महिला महाविद्यालय, जळगाव च्या प्रा. मीनाक्षी वाघमारे उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. विनोद किर्दक, समर्थ राजयोग चे संपादक, मा. वैभव स्वामी, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा, दीपाताई रोडे, सामाजिक कार्यकर्त्या वाघमारे ताई सह आदींची उपस्थिती होती. या वेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला कर्तुत्वांचा सन्मान करताना प्रा.कल्याणी राजेश शिंदे (चित्रपट व फोटोग्राफी), भावना बिडवे (सौंदर्य प्रसाधन), मा. प्रज्ञा दीपक जमधाडे ( लॅक्मे- प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट, बीड. ), कु.अंकिता जाधव( फॅशन डिझायनर),मा. शेख आयेशा ( पत्रकारिता ) यांना सन्मानचिन्ह, धम्म सेवक लक्ष्मणराव रोडे गुरुजी ग्रंथ व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. "मी सावित्री बोलतेय" या एकपात्री विचारनाट्य" प्रयोगाच्या सादरीकरणातून प्रा.मीनाक्षी वाघमारे यांनी सावित्रीमाईचे बालपण ते मृत्यूपर्यंतचा संपूर्ण संघर्षमय जीवनपट दर्शविला. सुस्पष्ट संवाद, डोळ्यात पाणी आणणारा अभिनय, न थकता सावित्रीमाईमध्ये एकरूप होऊन त्यांनी स्त्रीभ्रूणहत्या, महिलांवर होणारे विविध अत्याचार आणि सावित्रीमाई यांनी महिलांसाठी राबविलेले विविध उपक्रम यातील विविध प्रसंगाचे अतिशय प्रभावी सादरीकरण केले. त्यांनी सादर केलेल्या या प्रयोगास प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. अंकुश कोरडे यांनी मानले. यावेळी आयोजक म्हणून तुलसी शैक्षणिक समूहातील तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालय, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, तुलसी इंग्लिश स्कुल, तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग, माता रमाई कॉलेज ऑफ नर्सिंग, बीड. येथील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवारासह शहरातील महिलांची संख्या लक्षणीय होती.

## उमरगा तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अंबादास जाधव

**उमरगा । प्रतिनिधी**

**उमरगा तालुका पत्रकार महासंघाच्या अध्यक्षपदी अंबादास जाधव यांची उपाध्यक्षपदी विकास गायकवाड, महेबुब पठाण तर सचिवपदी प्रदिप भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शनिवारी दि.४ रोजी शासकीय विश्रामगृहामध्ये बैठक घेण्यात आली.**










या बैठकीत सन २०२५ - २६ वर्षासाठीची नूतन कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. त्यात तालुकाध्यक्षपदी अंबादास जाधव यांची, उपाध्यक्षपदी विकास गायकवाड व महेबुब पठाण यांची तर सचिवपदी प्रदिप भोसले यांची निवड करण्यात आली. यावेळी खालील प्रमाणे कार्यकारिणीची निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष - देवसिंग राजपूत, सहसचिवपदी - विश्वास सोनकांबळे, कोषाध्यक्ष - महादेव पाटिल, संघटक - आकाश पोतदार, सहकोषाध्यक्ष - जाफर जमादार, मुख्यसल्लागार - गुणवंत जाधवर, सुभाष जेवळे, प्रसिद्धीप्रमुख - मोहन जाधव तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आदिनाथ भालेराव, शंकर बिराजदार, लक्ष्मण पवार, उमेश सूर्यवंशी, अमोल गायकवाड, विशाल देशमुख, अनिकेत औरादे, शिवराज पाटिल, हणमंत शंके, सुरज आबाचणे, आनंद बागल, अमोल सुरवसे यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. यावेळी या बैठकीत आगामी काळात पत्रकारासाठी कार्यशाळा, रक्तदान शिबिर, पत्रकारासाठी पुरस्कार आधी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## पाटोदा गटशिक्षणाधिकारी सतत गैरहजर शाळा भेटीकडे दुर्लक्ष

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा येथील गटशिक्षणाधिकारी हे बीड इथून कारभार पाहत असून तालुक्यातील शाळा वाऱ्यावर सोडल्या असून शाळांकडे दुर्लक्ष करत आहेत कोणत्याही शाळेला भेट देत नसून महिन्यात एकदाच येवून सगळ्या शाळांना भेट दिली असे दाखवत आहेत तरी याची चौकशी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी अशी मागणी पालकातुन होत आहे.**



तालुक्यात शिक्षण विभागाचा बोजवारा उडाला असून गटशिक्षणाधिकारी सह अन्य कर्मचारी बीड इथून कारभार पाहत असून यामुळे मात्र विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात असून गटशिक्षणाधिकारी हे कार्यालयातही सतत गैरहजर राहत असून तालुक्यातील शाळांना भेटी कडेही दुर्लक्ष करत आहेत यामुळे मात्र विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले असून तरी याकडे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ पाटोदा गटशिक्षणाधिकारी कार्यालयाची चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी पालकासह विद्यार्थ्यांकडून होत आहे.

## पान १ वरून...

### महाराष्ट्रात विमा योजनेकरिता ६९

किंमत देण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. अतिवृष्टीत शेतीचे प्रचंड नुकसान झाल्यास सॅटेलाइटद्वारे पिकाची पाहणी करून थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेणार आहे. सोयाबीन, कांदा पिकाला जास्तीत जास्त भाव देण्याचा सरकारचा मानस आहे. तांदळाचे निर्यात धोरण लवकरच हाती घेत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ हे वर्ष शेतकऱ्यांना समर्पित केले असून देवाची पुजा समजून संपूर्ण देशात विविध विभागांच्या वतीने सेवाकार्य सुरू आहे." शेतकऱ्यांना रास्त भावात खते मिळण्यासाठी ३ हजार ८०० कोटी रुपये तर महाराष्ट्रात विमा योजनेकरिता ६९ हजार कोटींची तरतूद कॅबिनेट बैठकीत करण्यात आली आहे. कांद्याचे निर्यातमूल्य ४० टक्क्यांवरून २० टक्के करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नाफेड व इतर संस्थेकडून कांदा खरेदी सुरू ठेवण्याचाही निर्णय झाल्याचे कृषिमंत्री चौहान यांनी सांगितले. दिल्लीतील शेतकऱ्यांना तेथील राज्य सरकार लाभ देत नसल्याची टीका त्यांनी केली.या वेळी आमदार विठ्ठलराव लंघे, मराठा महासंघाचे सरचीटणीस संभाजी दहातोंडे यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

-------------

### सुदर्शन घुलेसह तिघांना १४

या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे, तर आरोपींना मदत करणाऱ्या एका व्यक्तीला मुंबईतून अटक करण्यात आली. या आरोपींच्या अटकेनंतर पोलिसांकडून त्यांना केज कोर्टात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि सिध्दार्थ सोनवणे या तिघांना १४ दिवसाची सीआयडी कोठडी सुनावली. दरम्यान युक्तिवाद सुरू असातना आरोपीच्या वकिलाने कोर्टात खळबळजनक दावा केला आहे. आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणात सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतली आहे. ते या प्रकरणात सातत्याने आकाचा उल्लेख करत आहेत. आता हा आका नेमका कोण आहे? याबाबत आरोपीच्या वकिलाकडून खळबळजनक दावा करण्यात आला आहे, आका-आका म्हटले जातेय तो आका म्हणजे विष्णू चाटे हाच आहे, तो आधीपासूनच कोठडीत आहे, असा दावा आरोपीच्या वकिलाकडून करण्यात आला.

----------

### ..तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू

यांनी वापरली. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील दोन आरोपींना पुण्यातून अटक करण्यात आली. तर ३१ डिसेंबरला वाल्मिक कराड देखील पुण्यातच सीआयडीला शरण आला होता. यावर बोलताना सर्व आरोपी पुण्यातच कसे सापडतात? आरोपींना पुण्यात कोणी सांभाळले? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, माणसांच्या हत्या होत असल्याने सहन होत नाही, एकही आरोपी बाहेर आला तर सोडणार नाही. धनंजय मुंडे हत्या प्रकरणात सापडले तर त्यांना रस्त्यावर देखील फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. दरम्यान पुढे बोलताना जरांगे म्हणाले, आमच्या समाज बांधवांना त्रास झाला तर अलिकडून परभणी आणि पलिकडून धाराशिव असल्याने यांना घरात घुसून घुसून हाणू अशीही भाषा वापरली.

---------

### ...तर आकाच्या आकानेही

परभणीचे खा. संजय जाधव, आ. सुरेश धस, संदीप क्षीरसागर, राहुल पाटील यांच्यासह इतर स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. जे दोषी असतील त्यांना फाशी द्या, असे आकाचे आका म्हणतायत पण आधीच चांगलं वागायचं, असंही त्यांनी आधीच सांगायला हवं होतं, असे सुरेश धस म्हणाले. हत्या कोणी घडवून आणल्या? मास्टरमाइंड कोण? हे माहिती नसेल तर बारामतीची माणसं परभणीत पाठवा. २००-५०० कुटूंब घर सोडून गेले. ते जीव मुठीत राहिले आहेत, असे सुरेश धस यांनी अजित पवार यांना उद्देशून म्हटले. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांची नुसती चौकशी करु नका, यांच्यावर मकोका लावा, असे बीडचे आमदार सुरेश धस म्हणाले आहेत.

--------

### राज्यात होणार १५ हजार

अडचणी दूर झाल्या आहेत. त्यामुळे त्या जिल्हा परिषदांमधील एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के शिक्षकांची भरती आता दुसऱ्या टप्प्यात केली जाणार आहे. सध्या पवित्र पोर्टलच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू असून त्यासाठी देखील निविदा काढून नव्याने मान्यता किंवा पूर्वीच्याच मक्तेदाराला मुदतवाढ आवश्यक आहे. त्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या प्रस्तावाला सरकारची मान्यता आवश्यक आहे. नूतन शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**शिलेबाजीला लगाम ; संस्था चालकाच्या हातात काहीच नाही**

खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलवरूनच एका पदासाठी दहा उमेदवार दिले जाणार आहेत. त्यांच्या मुलाखती घेऊन त्यातील एकाची निवड करण्याचा अधिकार संबंधित संस्थेला असणार आहे. पण, या मुलाखतीवेळी शिक्षण विभागाचा प्रतिनिधी उपस्थिती राहील, असे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे खासगी संस्थांमधील शिक्षक भरतीतील मनमानी किंवा वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

----------

### सुरेश धस यांना

दहशतवाद, बंदुकीचे राज्य मोडून काढायचे आहे. ज्या दिवशी आम्हाला वाटेल यात काहीतरी पडद्यामागे वेगळे घडत आहे तेव्हा आम्ही त्याला वाचा फोडू. उद्धव ठाकरेंनी बीडला भेट न दिल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, तिथे जाऊन भूमिका मांडणे, राजकारण करणे यापेक्षा तपासासंदर्भात प्रश्न करणे जे आम्ही करत राहिलो ते महत्त्वाचे आहे. मोर्चाला जाणं, पत्रकार परिषदेला जाणे हे आम्ही केले. परभणीतील सूर्यवंशी आणि बीडमधील संतोष देशमुख हत्या दुःखदायक आहेत. त्यांच्या कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे. लवकरच उद्धव ठाकरे कुटुंबाला जाऊन भेटणार आहेत, राजकारण करण्यासाठी नाही. दोघांच्या कुटंबाला जाऊन भेटतील. पोलीस काय कारवाई करत आहेत याची आम्ही वाट पाहत होतो, अशी माहिती त्यांनी दिली.

-----------

### राहुल गांधींचा गोपनीय प्रवास

देण्यात आले आहेत. डेटा शेअरिंग ब्रिजच्या या प्रणालीचे नियम २०२२ पासून अस्तित्वात असताना, आता १ एप्रिल २०२५ पासून सर्व विमान कंपन्यांना प्रवासी माहिती सीमा शुल्क विभागासोबत सामायिक करणे अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या परदेश यात्रेसंबंधी नेहमी चर्चा होत असते. ते कुठे जातात, कोणाला भेटतात ? यावरुन भाजपकडून टीका केली जाते. त्यांच्या दौऱ्यांची माहिती गोपनीय राहत असते. मात्र, आता ही गोपनीयता संपुष्टात येणार आहे. या नियमाच्या अंमलबजावणीमुळे राहुल गांधींच्या परदेश वाऱ्यांविषयी सर्व माहिती पुढे येण्याची शक्यता आहे. प्रवाशांची ही माहिती ५ वर्षांसाठी संग्रहित केली जाईल. आवश्यक असल्यास, ते इतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांसह देखील सामायिक केली जाऊ शकते. यासाठी सर्व विमान कंपन्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय तस्करीवर लक्ष ठेवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. सीमाशुल्क विभाग वेळोवेळी माहितीचे विश्लेषण करेल. कोणत्याही व्यक्तीच्या परदेश प्रवासात संशयास्पद प्रकार निदर्शनास आल्यास त्वरित तपास सुरू करण्यास यामुळे मदत होणार आहे.

-----------

cmyk


# राज्य लोकतंत्र


नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि.०५ जानेवारी २०२५




## रेल्वे सल्लागार समिती सदस्यपदी बाबुराव भवर

जालना । प्रतिनिधी



**माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शिफारशी नूसार रेल्वे प्रशासनाने स्थानिक सल्लागार समिती गठीत केली असून यात प्रा. राजेंद्र भोसले, शिवराज जाधव, बाबुराव भवर, ममता कोंड्याल यांचा समावेश आहे.**

जालना रेल्वे स्थानक येथे देखरेख, तसेच प्रवाशांच्या अडचणी लक्षात घेऊन विकासाच्या दृष्टीने समिती सदस्य योग्य सूचना करतील. दरम्यान निवड झाल्याबद्दल आ.नारायण कुचे, जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे, बद्रीनाथ पठाडे,भारतीय जनता पार्टीचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत , विजय कामड,विमलताई आगलावे,महानगराध्यक्ष सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे , गणेश जल्लेवार आदींनी सदस्यांचे अभिनंदन केले आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी आर्थिक उन्नती आवश्यक -कुलगुरू इन्द्रमणि

गेवराई । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव येथे दिनांक ०३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भव्य महिला शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. विद्यापीठ स्तरीय महिला शेतकरी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी हे लाभले होते. श्री सुभाष साळवे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड, श्री सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड, श्री सुखदेव चिंचोलीकर जिल्हा समन्वय अधिकारी माविम,बीड श्री मुरहरी सावंत, ईफको चे जिल्हा प्रतिनिधी श्री सय्यद, श्री डॉ. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. आज झालेल्या कार्यक्रमाच्या सुरवातीस केव्हीके खामगाव येथे डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गाय गोठा शेड चे उद्घाटन संपन्न झाले, तदनंतर आयोजित कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. मुख्य कार्यक्रमाच्या सुरवातीला स्व. वसंतराव नाईक तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. गिरधारी वाघमारे यांनी कार्यक्रमाचा उद्देश प्रतिपादन केला तसेच विस्तार शिक्षण संचालनालय व कृषि विज्ञान केंद्रा मार्फत शेतकऱ्यांसाठी चालणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती देखील उपस्थित शेतकरी महिला तसेच शेतकऱ्यांना दिली. तदनंतर शेतीपूरक व्यवसायांमध्ये उत्तुंग भरारी घेतलेल्या शेतकरी महिलांचा मान्यवरांच्या हस्ते शॉल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात



### केव्हीके खामगाव येथे महिला शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न

आला. प्रातिनिधिक स्वरूपात गायीच्या शेणापासून विविध वस्तू तयार करणाऱ्या सौ उमाताई औटी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून यशस्वी उद्योजिका महिला सौ. सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना यांनी त्यांच्या अनुभवाच्या कथनातून महिलांना प्रेरीत केले. तसेच त्यांनी असे प्रतिपादन केले कि महिला या जन्मतः सक्षम असतात फक्त त्यांची त्यांना जाणीव करून घेण्याकरिता विद्यापीठाच्या सहकार्याची गरज असते. उद्योगामध्ये भरारी घेण्यासाठी सातत्य, चिकाटी, मालाची गुणवत्ता टिकवणे महत्त्वाचे असते. त्यांनी महिलांना बाजारपेठेत आपला माल विकण्यासंदर्भात विविध प्रकारचे उदाहरणे देऊन प्रेरित केले. त्याचप्रमाणे तांत्रिक सत्रात महिलांचे काबाड कष्ट कमी करण्यासंदर्भात प्रात्यक्षिकासह विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञानाविषयी डॉ. नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणी यांनी या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. माविम चे जिल्हा समन्वय अधिकारी श्री सुखदेव चिंचोलीकर यांनी महिला बचत गटाच्या आर्थीक उन्नतीसाठी ५९ लाखाच्या चेक द्वारे मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना देण्यात आले. डॉ. शिवाजी पवार यांनी नॅनो युरिया चे महत्व सांगून उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यापीठाचे कुलगुरू मा प्रा डॉ. इन्द्र मणि यांनी आर्थीक उन्नती झाल्याशिवाय महिला सक्षमीकरण होणे अशक्य असल्याचे मत व्यक्त केले. महिला सक्षमीकरण करावयाचे झाले तर महिलांकडे निर्णय प्रधानता, आर्थिक बळ या बाबी महत्वाच्या आहेत. मोठया संख्येने उपस्थित महिलांचे अभिनंदन व कौतुक मा कुलगुरू महोदयांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केव्हीके च्या कार्यक्रम समन्वयक डॉ दिप्ती पाटगावकर यांनी केले तर सूत्रसंचालन विषय विशेषज्ञ डॉ हनुमान गरुड यांनी केले, सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ प्रशांत देशमुख व केव्हीके मधील शास्त्रज्ञ डॉ किशोर जगताप, डॉ श्रीकृष्ण झगडे, डॉ तुकेश सुरपाम, दत्तप्रसाद वीर,विजय चांदणे, सुधाकर काटे, उमेश वारे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात डॉ. डी. के. पाटील, डॉ एस. बी. पवार, डॉ वसंत सूर्यवंशी, डॉ गजानन गडदे, डॉ. संतोष चिक्षे, दैनिक सकाळ ॲग्रोवन चे श्री. संतोष मुंढे, पवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी महिला तसेच शेतकरी उपस्थित होते.

## अनुपस्थित वैद्यकीय अधीक्षक यांच्या खुर्चीला हार घालत गांधीगिरी

**कळमनुरी । प्रतिनिधी**

मुख्यालयी राहत नसलेल्या उपजिल्हा रुग्णालय कळमनुरी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.करपे यांच्या खुर्चीला आंबेडकरी जनतेने पुष्पहार घालून केली गांधीगिरी करीत आपला निषेध व्यक्त केला

येथील उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर विठ्ठल करपे हे मुख्यालयी राहत नसून हिंगोली वरून रुग्णालयाचा कारभार पाहत आहेत. स्वतः वैद्यकीय अधीक्षकच मुख्यालयी राहत नसल्याने इतर तज्ञ वैद्यकीय अधिकारी व चार-चार इन्चार्ज सिस्टर सुद्धा मुख्यालयी राहत नसल्याने रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांची प्रचंड हेळसांड होत आहे. आज बौद्ध समाजाचे कार्यकर्ते आपल्या रुग्णांच्या तब्येतीची विचारपूस करण्याकरता रुग्णालयात गेले असता तेथे



कोणीही तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हता तसेच वैद्यकीय अधीक्षक कार्यालयात गेल्यानंतर वैद्यकीय अधीक्षक डॉ.करपे हे देखील अनुपस्थित होते. कार्यकर्त्यांनी वैद्यकीय अधीक्षकांना फोन केला असता त्यांनी अर्वाच्य भाषेत बोलून तुमच्याच्याने काय होते ते करा, दोन डॉक्टर ड्युटीवर आहेत बाकीचे आपापल्या घरी आहेत अशा शब्दात उडवा उडवीची उत्तरे दिली व फोन करणाऱ्यांनाच उलट धमक्या दिल्या. त्यामुळे रुग्ण नातलगांनी लोकशाही पद्धतीने गांधीगिरी करत वैद्यकीय अधीक्षक यांच्? निषेध केला.

## स्व.संतोष देशमुख यांना न्याय द्या ; धारूर शहरात कँडलमार्च

### सर्वधर्मीय नागरिकांनी सहभागी होत श्रद्धांजली अर्पण केली

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मासाजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ धारूर शहरातील सर्व समजा बांधवांच्या वतीने कँडलमार्च चे आयोजन करण्यात आले या वेळी. शहरातील महिला अबालवृद्ध नागरिक मोठ्या संख्येने हजर राहून हत्तेचा निषेध नोदवला.

मसाजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांची निर्घुण हत्या करणाऱ्या आरोपींना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा देऊन त्यांच्या कुटुंबीयांना न्याय दयावा,यासाठी किल्ले धारूर




शहरामध्ये दिनांक ३ जानेवारी वार शुक्रवार रोजी सायंकाळी ६ वाजता कॅन्डल मार्च आयोजन केले होते कसबा विभागात धारेश्वर मंदिर येथून कॅन्डल मार्चला सुरुवात करण्यात आली काशिनाथ चौक बाजारपेठ मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात समारोप स्व.संतोष देशमुख यांच्या श्रद्धांजली वाहिली यावेळी शहरातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध नोंदवाला. संतोष देशमुख अमर रहे च्या घोषणाही देण्यात आले तसेच लवकर शोध घेऊन कठोर शासन करण्याची मागणी ही नागरिकांनी केली आहे राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व्यापारी पत्रकार नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

## ग्राहकांच्या विश्वासावर पुर्णवादी बँकेची यशस्वी वाटचाल माजलगाव शाखेतून ग्राहकांना मिळणार दर्जेदार सुविधा -चेअरमन डॉ. सुभाष जोशी



माजलगाव । प्रतिनिधी

पूर्णवादी बँकेच्या सर्व शाखेमध्ये माजलगाव शाखेचा अग्रगण्य क्रमांक असुन येथील ग्राहकांच्या विश्वासावरच पुर्णवादी बँकेची यशस्वी वाटचाल सुरू असुन येथील शाखेतुन ग्राहकांना तत्पर व दर्जेदार सुविधा मिळतील असा विश्वास पूर्णवादी बँकेचे चेअरमन डॉ. सुभाष जोशी यांनी व्यक्त केला.येथील पूर्णवादी बँकेच्या शाखेने ग्राहक मेळाव्याचे आयोजन आज ता. ४ शनिवारी करण्यात आले होते.

या मेळाव्यास डॉ. आर. जी. बजाज, जिवन जगताप, सुरेंद्र कलंत्री, शशिकिरण गडम, महेश पारगांवकर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले उपस्थित होते. यावेळी बोलतांना चेअरमन जोशी म्हणाले की, माजलगाव तालुका हा समृध्द व माणुसकी जपणारा तालुका म्हणुन सर्वपरिचीत आहे. येथे पतसंस्था, बँका यांची संख्या जवळपास दोनशेच्या अधिक असतांना देखील येथील पूर्णवादी शाखेतील ठेवी व ग्राहकांचे बचत खाते, करंट खाते व कर्जवाटप मोठ्या प्रमाणावर आहे तर सर्व शाखेंपैकी सर्वात मोठी शाखा म्हणुन माजलगाव शाखेची गणना केली जाते. बँकेकडे ९७ कोटी रूपयांच्या ठेवी असुन ११२ कोटी रूपयांच्या ठेवीचे उद्दीष्ट या शाखेसाठी ठेवण्यात आले असल्याचेही सांगीतले तर ग्राहकांच्या विश्वासावरच या बँकेची यशस्वी वाटचाल असुन वाढीव कर्मचारी देण्याबरोबरच गोल्ड लोनसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे सांगीतले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, संतोष मुळी, बळीराम सोळंके, उमेश रत्नपारखी, सुलेख कलंत्री यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन व आभार अमोल कुलकर्णी यांनी मानले.

## नांदूर, सावरगांव येथील हॉटेलवरील देशी, विदेशी दारू जप्त ; अंभोरा पोलिसांकडून धाडसत्र सुरू !

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

बीड-पोलिस अधीक्षक नवनवीन कॉवत यानी जिल्ह्याचे सूत्र हाती घेतल्यापासून अवैध धंद्यावाल्याची पाचावधारण बसली असतानाच ठाणेदारांना देखील तश्या सूचना दिल्याने आता ठाणेदार देखील ॲक्टीव झाल्याचे दिसुन येत आहे. अंभोरा पोलिसांनी अवैध धंद्यावर धाडसत्र सुरू केले असून शुक्रवारी नांदूर, सावरगांव येथील हॉटेलवर धाड टाकुन देशी, विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी अवैध धंद्यावर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरवात केली आहे. हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी हद्दीत गांजा, दारू, मटका, जुगार, यासह अवैध धंदे जिथे कुठे असतील



ते बंद करण्यासाठी आता धाडसत्र सुरू करण्यात आले असुन शुक्रवारी हद्दीतील नांदूर विठ्ठलाचे, सावरगांव येथील हॉटेलवर १४३५० रुपयांची देशी, विदेशी दारू जप्त केली.

सदरील कारवाई अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष क्षीरसागर, दाताळ, लुईस पवार, दत्तात्रय टकले, पोलीस शिपाई पडवळ यांनी केली आहे.

ठाणे हद्दीतील जनतेला ठेणेदाराचे आवाहन अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत कोठेही अवैध धंदा आपल्या निदर्शनास येत असेल तर त्याबाबत तात्काळ मला माहिती कळवावी. त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई करुन अवैध धंद्याचे सर्व पाळमूळ उखडून टाकले जातील. माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल. असे अहवान ठाणे हद्दीतील जनतेला करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### जय भारती प्रतिष्ठानच्या अंबाजोगाई

मानवलोकचे कार्यवाहक स्वर्गीय द्वारकादासजी लोहिया उर्फ बाबूजी यांना देण्यात आला होता.त्यानंतर अंबाजोगाईचे भूमिपुत्र मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माननीय अंबादासरावजी जोशी साहेबांना सन २०२० मध्ये अंबाजोगाई भूषण पुरस्कार जाहीर झाला होता.त्यानंतर चालू वर्षी अंबाजोगाई भूषण पुरस्कार हा अंबाजोगाई शहरातील ज्येष्ठ पत्रकार,शेतकऱ्यांसाठी अविरतपणे संघर्ष करणारे शेतकऱ्यांचे नेते व तसेच साहित्यिक अमर हबीब काका यांना अंबाजोगाई भूषण पुरस्कार देण्यात आला . या पुरस्काराचे वितरण हे महाराष्ट्र गोवा वकील परिषदेचे माजी चेअरमन तथा सलग पाच वेळा महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे राहिलेले सदस्य व तसेच माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठविधीज्ञ ॲड वसंतरावजी साळुंखे साहेब यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणामध्ये करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीग बॉस फेम छोटा पुढारी घनश्यामजी हे व तसेच उच्च न्यायालयातील ॲड टेळे आण्णा , ॲड देवणे साहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सन्मान पत्राचे वाचन हे प्रा सुनील साळुंखे यांनी केले.तसेच जय भारती सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड माधव जाधव,उपाध्यक्ष प्रा सुनील साळुंखे,सचिव ॲड अनिल लोमटे,कोषाध्यक्ष राजू शेठ भन्साळी सहसचिव जीडी थोरात व त्याचप्रमाणे संस्थेचे पदाधिकारी योगगुरू इंजिनियर परमेश्वरजी भिसे सर,ॲड श्रिनिवास अंबाड, शेतकरी नेते कालिदासराव आपेट व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीमध्ये हा भव्य दिव्य सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष ॲड माधव जाधव यांनी केले.

### लिंबागणेश येथे गतिरोधकासाठी

असताना मांजरसुंभा ते चुंभळीफाटा मार्गाचे कंत्राटदार असणारी एचसीपीएल कंपनीने त्याच धर्तीवर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला. तहसीलदार चंद्रकांत शेळके , अशोक ससाणे उप अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असुन लवकरात लवकर गतिरोधक बसविण्यात येतील या आश्वासनानंतर ''ठिय्या आंदोलन'' मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक डरपे, एचसीपीएल कंपनीचे प्रतिनिधी दादा बांगर,नेकनुर पोलिस स्टेशनचे ढाकणे ,लिंबागणेश पोलिस चौकीचे पोहे. बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंडे, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे, सहशिक्षक मूकुंद मोटे, गणेश आजबे, सचिन. वाणी ,मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, अवधूत ढास,पिंपरनईचे सरपंच बाळासाहेब वायभट, अभय वनवे, गणेश जाधव, महावीर जाधव आदी उपस्थित होते.

### गजानन विद्यालयात

पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले बी.एस. तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनिंनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य केशव भांगे यांनी क्रांतीज्योजी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देऊन त्यांच्या कार्याचा सर्वांनी आदर्श घ्यावा असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जयदीप सरवदे यांनी केले तर माणिक अनुसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्टगिताने झाली.

### बसच्या महिला वाहकाने

केली आहे तर सोलापूर आगारासह इतर अनेक आगारातील चालक वाहक चौसाळा व पारगाव येथे नियोजित ठिकाणी थांबा असताना ही सदर अनेक बस हे बायपास वरुन गाडी घेऊन जातात त्यामुळे प्रवाशांचे हाल व कुचंबना सुरू आहे तरी संबंधित अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी दखल घेऊन चौसाळा व पारगाव येथे गावात गाडी जाण्याच्या सूचना देऊन नागरिकाचे हाल थांबवते अशी प्रवाशी नागरिकांची मागणी आहे.

## पुरवठा विभागातील ऑनलाईन डेटा फिटिंग सुविधा तात्काळ चालू करा

**भाजपचे तालुकाध्यक्ष शंकर सूर्यवंशी यांच्यामार्फत कळमनुरी तहसीलदारांना निवेदन**

हिंगोली । प्रतिनिधी

पुरवठा विभागातील ऑनलाईन डेटा फिटिंग सुविधा तात्काळ सुरू करण्यासंदर्भात व गरीब अल्पभूधारक एन पी एच कार्डधारकांना प्राधान्य अर्डा समावेश करून धान्य सुविधा मिळण्यासंदर्भात दिनांक २ जानेवारी रोजी भारतीय जनता पार्टी कळमनुरी तालुक्याच्या वतीने माननीय तहसीलदार कळमनुरी यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात अशी मागणी करण्यात आली पूरवठा विभागातील ऑनलाइन डेटा फिडींग सुविधा तात्काळ सुरु

करण्यात यावी व गरीब अल्पभूधारक एन पि एच कार्ड धारकांचा प्राधान्य कार्डात समावेश करुण धान्य सुविधा मिळणे बाबत.तसेच सायलेंट आर सी



असतील तर त्या जागी नव्याने एन पि एच धारकांना सुविधा देण्यात यावी. तसेच शेतकरी कुटुंब धारकांचा प्रति युनिट आर्थिक मदत लाभाच्या योजनेची तात्काळ अंमलबजावणी करून दिलासा शेतकरी कुटुंबाला द्यावा

अशा मागणीचे निवेदन मा तहसिलदार यांना भारतीय जनता पार्टी कळमनुरी च्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे कळमनुरीचे तालुकाध्यक्ष शंकर सुर्यवंशी प्रकाश नाईक राहुल मेने अशोक संगेकर शहराध्यक्ष अमिष दरक अंबादास कल्याणकर विकास ठाकुर दामुअणा शिंदे सोनबा बूर्से नारायण डुरे दता पंचलिंगे भागवत ठाकुर गणपत वाढवे मुकेश इंगोले,अनिल इंगळे सतिष कुळकर्णी, एहसान सिदीकी,साजेद पठाण, विजय शिंदे, शंतनु सुर्यवंशी जि वाय पतंगे, अनिस बागवान, उपस्थित होते.

## ग्लोबल पब्लिक इंग्लिश स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

हिंगोली । प्रतिनिधी

हनुमान नगर भागातील शिव शाहू प्रतिष्ठाण पिंपळखुटा द्वारा संचलित नामवंत ग्लोबल पब्लिक स्कुल मध्ये सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष प्रा.ज्ञानदत्त जऊळकर व शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी गजानन खंडूळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच यावेळी विध्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत तयार होऊन आल्या होत्या.यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ज्ञानदत्त जऊळकर, सुरेखा जगताप,सीमा जऊळकर, वैशाली सोळंके,मीरा शिंगारे, ज्योती मस्के,ममता व्यास,सीमा माखणे,शेहनाज सय्यद,सबीहा नाझ सय्यद, प्रज्ञा खडसे,सोनाली कांबळे,विद्या शिंदे,अश्विनी जाधव,पूजा गवळी,कमळाजी जऊळकर,श्री गजानन खडूळे,रत्नाकर वानखेडे,सीमा रणवीर,रूपाली काळे,मनीषा डुकरे आदी उपस्थित होते.




cmyk

# रामदऱ्यामध्ये जानेवारीत कृष्णा खोऱ्याचे पाणी

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

धाराशिव : मराठवाड्याच्या न्यायहक्काच्या कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना क्र.२ मधील पाचव्या टप्प्याचे काम अंतिम होत आले आहे. या वर्षी झालेला अधिकचा पाऊस, भूसंपादन प्रक्रियेत जाणीवपूर्वक आणलेले अडथळे व वीज वाहक तारेच्या चोरीमुळे डिसेंबर अखेरीस अपेक्षित असलेली पंपगृहाची चाचणी आता जानेवारीत घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे सिंदफळ तलावातील पाणी तुळजाभवानी देवीच्या चरणी रामदरा तलावात पुढील महिन्यात दाखल होणार असून, या कार्यक्रमासह अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या या योजनेच्या पाहणी व आढावा बैठकीसाठी वेळ देण्याची विनंती जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना केली आहे, अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली.

जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नुकतीच आढावा बैठक घेण्यात आली. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचे तपशीलवार सादरीकरण करण्यात आले. उपसा सिंचन योजना क्र. २ बरोबरच एकूण प्रकल्प कार्यान्वित होण्यास नक्की किती कालावधी लागणार, नेमक्या कोणत्या



अडचणी अजूनही आहेत आणि त्या दूर करण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात याबाबत सविस्तर चर्चा झाली. कालमर्यादा निश्चित करून प्रत्येक शिल्लक काम पूर्ण करण्याबाबतचा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तक्ता देण्यात आला आहे. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्रमांक २ चे काम सध्या मोठ्या वेगात सुरू आहे.

यावर्षी अपेक्षेपेक्षा अधिकचा पाऊस झाल्याने तसेच भूसंपादन प्रक्रियेत जाणीवपूर्वक आणलेले अडथळे व वीज वाहक तारेची २ वेळा झालेली चोरी यामुळे यापूर्वी निर्धारित केल्यानुसार डिसेंबर अखेरीस चाचणी घेता आली नाही.या बाबींवर आता तोडगा काढण्यात आला असून, जानेवारीत टप्पा क्रमांक ५ ची चाचणी घेण्यात येणार आहे. पाचव्या टप्प्याच्या चाचणीसह, या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची पाहणी व आढावा बैठक घेण्यासाठी पाटील यांना वेळ देण्याची विनंती करण्यात आली आहे. कामांचा नियोजित आराखडा जाणून घेत स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी विभागाच्या अधिकारी आणि कंत्राटदारांनी समन्वयाने नियोजनानुसार काम पूर्ण करण्याबाबत सूचना केल्या आहेत. भूसंपादनाबाबत असलेल्या अडी-अडचणी प्राधान्याने दूर करण्याबाबत सोलापूर आणि पुणे जिल्हाधिकारी यांना सूचना करण्यात आल्या आहेत आणि सर्व भूसंपादन प्रकरणे निकाली काढणेबाबत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत.


## या टप्प्यांचे काम पूर्ण

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या टप्पा क्र. २ अंतर्गत एकूण ५ पंपगृह आहेत. यापैकी टप्पा क्र. २, ३ व ५ मधील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा क्र. १ व ४ मधील ही ७५ टक्क्यांहून अधिक कामे पूर्ण झाली आहेत. आपल्या जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने टप्पा क्र. १ व ४ मधील कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत संबंधित कंत्राटदारांना सूक्ष्म नियोजन करून त्याप्रमाणे काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# चिकू वरील किटक नष्ट करण्यासाठी उपाययोजना

सध्या अनेकांचा कल हा फळबाग लागवडीकडे वळला आहे. त्यामुळे अनेकजण फळबाग लागवड करत आहेत. यामध्ये चिकूची देखील लागवड शेतकरी करत आहेत. चिकू हे देशातील लोकप्रिय फळ आहे. मात्र, त्याची किंमत जास्त असल्याने ती अजूनही अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. चिकूची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात. भारतात याची लागवड प्रामुख्याने कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये केली जाते. मात्र चिकूमध्ये अनेक हानिकारक कीटक आणि रोग आढळून आल्याची माहिती मिळत आहे. ज्यावर योग्य वेळी नियंत्रण न मिळाल्यास पिकाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे यावर योग्य वेळी नियंत्रण मिळवणे खूप गरजेचे आहे.चिकूमधील कीटक आणि प्रतिबंध :१) पानांचे जाळे -

चिकूच्या झाडावर पानांच्या जाळ्याने हल्ला केल्यावर पानांवर गडद तपकिरी ठिपके दिसतात. त्यामुळे पाने सुकतात आणि झाडाच्या फांद्याही हळूहळू सुकतात. त्यामुळे बागायतदारांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे याचे वेळीच निरीक्षण करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. यावर नियंत्र करण्यासाठी नवीन कोंब तयार होण्याच्या वेळी किंवा फळे काढणीच्या वेळी कार्बारील ६०० ग्रॅम किंवा क्लोरपायरीफॉस २०० मि.ली. किंवा क्विनालफॉस ३०० मि.ली. १५० लिटर पाण्यात मिसळून २०



दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. असे केल्यास यावर नियंत्रण मिळवता येईल.

२) अंकुर सुरवंट - अंकुर सुरवंट हा कीटक वनस्पतींसाठी अतिशय धोकादायक आहे. वास्तविक, सुरवंट वनस्पतींच्या कळ्या खाऊन नष्ट करतात. यामुळे तुमच्या उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता असते. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली किंवा फेम २० १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. ही फवारणी केल्यास रोगावर नियंत्रण ठेवता येईल.३) केसाळ सुरवंट - चिकू पिकामध्ये हे कीटक कोवळ्या कोंबांचा आणि वनस्पतीला अन्न बनवून त्यांचा नाश करतात. उत्पादकतेवर मोठा परिणाम होतो. यावर नियंत्रण करण्यासाठी क्विनालफॉस ३०० मि.ली १५० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर फवारणी करावी. वरील तीन कीटकांचा प्रादुर्भाव चिकूवर प्रामुख्याने आढळून येतो. त्यामुळे तुम्हाला चिकूची योग्य ती काळजी गरजेचे आहे.

# लष्करी अळीपासून मका पिकाचे संरक्षण

खरिपातील मक्यावरील लष्करी किडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. लष्करी अळी हा अमेरिकेतील मूळचा विनाशकारी कीटक आहे. या किडीमुळे भारतातील मका पिकाचे खूप आर्थिक नुकसान होत आहे. त्याचे मूळ ठिकाण अमेरिकेच्या दक्षिणेकडील फ्लोरिडा आणि टेक्सासचे प्रदेश मानले जाते. परंतु आतापर्यंत त्याचे दुष्परिणाम भारतासह ७० देशांतील किमान ८० प्रकारची पिके, भाजीपाला, फळे आणि फुलांवर पसरले आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मका रिसर्च लुधियानाने ही हानिकारक कीड टाळण्यासाठी काही सूचना दिल्या आहेत.


लष्करी अळी संपूर्ण पीक नष्ट करते :लुधियानाच्या मते, लष्करी अळी मुख्यत्वे मका पिकाचे नुकसान करतात आणि मका नसताना ही कीड ज्वारीच्या पिकावर हल्ला करते. दोन्ही पिके शेतात उपलब्ध नसल्यास ऊस, भात, गहू, नाचणी या पिकांवर परिणाम होतो. त्याचबरोअबर कापूस आणि भाज्यांचे देखील नुकसान होऊ शकते. ही कीड एवढी धोकादायक आहे की जे काही पीक सापडते ते पूर्णपणे नष्ट करते.लष्करी अळी प्रादुर्भाव कसा ओळखायचा :लुधियाना येथील तज्ज्ञांच्या मते, लष्करी अळी १०० किलोमीटरपर्यंत उड्डाण करून ते पिकांना खातात.लष्करी अळी नर पतंग शरीराच्या दोन लक्षणांवरून ओळखता येतात. या किडीच्या मागील बाजूस मध्यभागी एक पिवळा डाग असतो आणि समोरच्या पंखावर पांढरा ठिपका असतो. लष्करी अळी ची मादी एकटी तिच्या आयुष्यात १००० पेक्षा जास्त अंडी घालते. त्यामुळे एकदा पिकांना लष्करी अळी लागली तर शेतकऱ्यांसाठी खूप चिंताजनक बाब बनते. लष्करी अळ्या हिरव्या किंवा गुलाबी, तपकिरी असतात.लष्करी अळीचे नियंत्रण कसे करावे : आयआयएमआर लुधियानाने लष्करी अळी नियंत्रणासाठी उपाय सुचवले आहेत. किडीचा हल्ला मक्याची उगवण झाल्यानंतर २-४ आठवड्यांनंतर होतो आणि ५ ते १० टक्के झाडाची लागण होते. सर्वप्रथम बीटेक २ मिली हे औषध प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. झाडातील नुकसान १० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास स्पिनटार्म ११.७% प्रति लिटर पाण्यात ०.५ मिली औषध मिसळून फवारणी करावी. मक्याच्या पिकावर ४ ते ७ आठवड्यांनी उगवण झाल्यानंतर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्यास आणि १०-२०% झाडांना प्रादुर्भाव झाला असल्यास, स्पिनेटोरम ११.७% एससी ०.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा क्लोरॅँट्रानिलिप्रोल १८.५ एससी ०.४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. या किडीमुळे २०% संक्रमित झाडे मक्याची उगवण झाल्यानंतर सात आठवडे आढळल्यास, स्पिनेटोरम ११.७% एससी ०.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा क्लोरॅँट्रानिलीप्रोल १८५ एससी ०.४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अशाप्रकारे फवारणी केल्यास तुम्ही या अळीवर नियंत्रण मिळवू शकता. यामध्ये महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या मका पीकामध्ये अळीचा जास्तच प्रादुर्भाव असेल तर तुम्ही कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊ शकता.



# देशी खते वापरल्यास नापीक जमीनही होईल एकदम सुपीक

जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म वाढवून सुपिकता टिकवण्यासाठी विविध पिकांना शेणखतांची शिफारस करण्यात आलेली आहे. परंतू शेतकऱ्यांकडे आज पुरेशा प्रमाणात व चांगल्या कुजलेल्या प्रतीच्या शेणखताची उपलब्धता होत नाही. त्यामुळे पूरक म्हणून हिरवळीची पिके घेतल्यास शेणखतांवरील खर्चात काही प्रमाणात बचत होऊ शकते. शेणखताची उपलब्धता कमी असल्यास आपण हिरवळीच्या खतांचे नियोजन काही प्रमाणात सेंद्रिय खतावरील खर्च कमी करू शकतो व सुपीकता टिकवू शकतो

हिरवळीच्या खतांचे प्रकार : १) हिरवळीचे पीक शेतात गाडणे. २) हिरव्या पानांपासून खत तयार करणे हिरवळीच्या पिकांची निवड : हिरवळीचे पीक कमी कालावधीत वाढणारे आणि भरपूर हिरवा पाला देणारे असावे. पिकांच्या फांद्या कोवळ्या आणि लुसलुशीत असाव्यात, म्हणजे कुजण्याची क्रिया लवकर होईल. पीक सुरुवातीच्या वाढीच्या काळात जलद वाढणारे असावे म्हणजे तणांचा प्रादुर्भाव कमी होईल. हिरवळीचे पीक द्विदल वर्गातील असावे, म्हणजे वातावरणातील नत्र स्थिर होण्यास मदत होते. पिकांची मुळे खोलवर जाणारी असावीत, जेणेकरुन जमिनीतील खालच्या थरातील अनद्रव्ये ही पिके शोषून घेतील. हिरवळीची पिके जमिीच्या प्रकारानुसार घेतल्यास वाढ चांगली होईल. उदा. क्षारयुक्त, चोपण जमिनीत धैंचासारखी पिके घ्यावीत. या जमिनीत इतर कडधान्ये, द्विदल वर्गातील हिरवळीची पिके घेऊ नये, कारण ती



क्षारास संवेदनशील आहेत.

हिरवळीच्या खतांसाठी पिके व पीक पध्दती : १) उहाळयात घेतली जाणारी पिके - लवकर वाढणारी ताग, धैंचा यासारखी पिके मे-जून महियात पेरून खरिप पीक घेण्याच्या अगोदर सर्वसाधारणपणे जुलै ऑगष्टमध्ये ती जमिनीत गाडावीत. २) मुख्य पिकांच्या ओळीमध्ये हिरवळीचे पीक घेणे - मुख्य पिकांच्या दोन ओळीमध्ये ही पीके एकाच वेळी आंतरपीक पध्दतीने घेतली जातात. उदा. भाताबरोबर ताग, बागायती कापूस व मका पिकांमध्ये ताग, चवळी, उडीद, मुग किंवा हरभरा, ऊसामध्ये आंतरपीक धैंचा किंवा ताग ही हिरवळीची पिके घेतली जातात ६ ते ८ आठवडयांनी ही पिके जमिनीत गाडावी लागतात. ३) मोकळ्या जमिनीत हिरवळीची पीके घ्यावीत -: खरीप हंगामात ताग, चवळी अगर धैंचा किंवा भाजीपाला पीके घेतात. या पध्दतीमुळे एक हंगाम वाया जातो. ४) हिरवळीचे मुख्य पीक घेणे - क्षारयुक्त चोपण जमीा सुधारण्यासाठी या पध्दतीचा उपयोग होतो. वाळूयुक्त जमिनीत फेरपालट करण्यासाठी हे उपयुक्त ठरते.

हिरवळीच्या पिकांचे फायदे : हिरवळीची पिके जमिनीत गाडल्यावर सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. त्यामुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची संख्या व वाढ चांगली होते आणि जैविक गुणधर्मांची सुधारणा होते. हिरवळीची पिके जमिनीच्या खालच्या थरातून अनद्रव्ये शोषून घेतात आणि ही पिके गाडल्याांतर अनद्रव्यांची उपलब्धता वरच्या थरात वाढते. हिरवळीची पिके द्विदलवर्गीय असल्यास हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण करण्यास मदत होते. उथळ/ हलक्या जमिनीची जलधारणशक्ती वाढते आणि रासायिाक खतातील पाण्याद्वारे वाहून जाणाऱ्या अनद्रव्यांचा ऱ्हास कमी होतो. भारी काळया, खोल जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा चांगला होऊन वाफसा स्थिती लवकर येते. हिरवळीच्या खतामुळे कठीण घडण झालेल्या जमिनीची घडण सुधारते, तसेच घनता कमी होऊन हवा खेळती राहते. पावसाच्या पाण्यामुळे होणारी मातीची धुप जमिनीची सरंचना सुधारल्यामुळे कमी होते. क्षारयुक्त जमिनीतील विरघळणारे विद्राव्य क्षार निचरा सुधारल्यामुळे कमी होतात त्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. हिरवळीच्या पिकांची वाढ जोमदार व जलद असल्यामुळे त्यामध्ये तणे वाढू शकत नाहीत. धैंचासारखे हिरवळीचे पीक चोपण जमिनीत चांगल्या प्रकारे वाढत असल्याो चोपण जमिनी सुधारण्यासाठी जिप्समसारख्या भूसुधारकेबरोबर धैंचा पीक जमिीत गाडावे. अशाप्रकारे जमिीची सुपिकता टिकविण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी दोन ते तीन वर्षांतून एकदा तरी हिरवळीचे पिके जमिनीत गाडावीत व त्याानुसार पिक पध्दतीमध्ये हिरवळींच्या पिकांचा अंतर्भाव करावा. यामुळे सेंद्रिय खतावरील खर्च कमी होऊन जमिनीत टाकलेल्या रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढेल, जमिीची जैविक सुपीकता वाढेल आणि शेती उत्पादन आर्थिकदृष्ट्या फायद्याचे होईल.




## जागतिक दिवस: ब्रम्हदेश (म्यानमार) चा मुक्तिदिन

### महत्वाच्या घटना

१६५९ : मुघल सम्राट औरंगजेबने शाह शुजा ला युद्धात हरविले.
१६६४ : छत्रपती शिवाजी महाराज सुरतेच्या सीमेवर पोहोचले. त्यांनी सुरतेचा सुभेदार इनायत खान याला खंडणी देण्यासाठी निरोप पाठविला.
१६७१ : मराठ्यांनी मुघलांबरोबर साल्हेरची लढाई जिंकली.
१९१९ : द जर्मन वर्कर्स पार्टीची स्थापना. या पार्टीचे पुढे नाझी पार्टीत रुपांतर झाले.
१९२४ : महाड महानगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्य लोकांसाठी खुले केले.
१९३३ : सॅन फ्रान्सिस्को येथील गोल्डन गेट ब्रिजच्या बांधकामाला सुरूवात झाली.
१९४८ : 'रोझ बाऊल फुटबॉल' स्पर्धेचा जगातील पहिला रंगीत माहितीपट 'वॉर्नर ब्रदर्स' तर्फे जगांतील चित्रपटगृहांत प्रदर्शित करण्यात आला.
१९४९ : पुणे यथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी सुरू झाली.
१९५७ : विक्रीकर कायदा सुरू झाला.
१९७१ : ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्या मध्ये पहिला एकदिवसीय क्रिकेट सामना मेलबर्न येथे खेळल्या गेला.
१९७४ : अंटार्क्टिकामधील सर्वोच्च तापमानाची (१५ सेल्सिअस) नोंद
१९९७ : रशियाने चेचेन्यातून सैन्य मागे घेण्यास सुरूवात केली.
१९९८ : ज्येष्ठ जर्मन समाजशास्त्रज्ञ गेरहार्ड फिशर यांना कुष्ठरोग आणि पोलिओ नियंत्रणाच्या क्षेत्रात भारतात केलेल्या कार्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते 'महात्मा गांधी शांतता पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
१९९९ : द जर्मन वर्कर्स पार्टीची स्थापना. या पार्टीचे पुढे नाझी पार्टीत रुपांतर झाले.
२००६ : भारत आणि नेपाळ ने पारगमन करार ६ महिन्यांनी वाढविला.
२०१४ : ला भारतीय संचार उपग्रह जीसॅट -१४ चे यशस्वी प्रक्षेपण. तेही भारतीय क्रायोजेनिक इंजिन चा वापर करून.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९२ : शहाजहान - ५ वा मुघल सम्राट (मृत्यू: २२ जानेवारी १६६६)
१६६६ : ला शिखांचे दहावे गुरु गोविंद सिंह यांचा जन्म.
१८५५ : किंग कँप जिलेट - अमेरिकन संशोधक व उद्योजक (मृत्यू: ९ जुलै १९३२)
१८६८ : मराठी संतकवी गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ दासगणू यांचा जन्म.
१८६९ : कन्नड साहित्यिक व्यंकटेश तिरको कुलकर्णी यांचा जन्म.
१८८० : ला भारताचे स्वातंत्र्य सैनिक बारीन्द्र कुमार घोष यांचा जन्म.
१८९२ : कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी - लेखक व मराठी भाषातज्ञ (मृत्यू: १२ जून
१९१३ : मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २००७)
१९२२ : मोहम्मद उमर 'मुक्री' - आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (मृत्यू: ४ सप्टेंबर २०००)
१९२५ : मराठी साहित्यिक रमेश मंत्री यांचा जन्म.
१९२८ : झुल्फिकार अली भुट्टो - पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान (मृत्यू: ४ एप्रिल १९७९)
१९३४ : भारतीय राजनीती तज्ञ मुरली मनोहर जोशी यांचा जन्म.
१९४१ : मन्सूर अली खान पतौडी - भारतीय क्रिकेट कप्तान आणि पतौडी संस्थानचे ९ वे व शेवटचे नबाब (मृत्यू: २२ सप्टेंबर २०११)
१९४८ : पार्थसारथी शर्मा - क्रिकेटपटू (मृत्यू: २० आक्टोबर २०१०)
१९४८ : फैय्याज - अभिनेत्री व गायिका
१९५२ : ला भारतीय संसदेचे सदस्य शुशील कुमार मोदी यांचा जन्म.
१९५५ : ममता बॅनर्जी - केंद्रीय मंत्री, पश्चिम बंगालच्या ८ व्या व पहिल्याच महिला मुख्यमंत्री
१९७३ : ला भारतीय चित्रपटाचे अभिनेते तसेच निर्माता उदय चोप्रा यांचा जन्म.
१९८६ : दीपिका पदुकोण - कन्नड, हिन्दी आणि तामिळ चित्रपट कलाकार.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४७ : कर्नाटक संगीताचे रचनाकार, संगीतशास्त्रज्ञ आणि गायक त्यागराज यांचे निधन.
१९३३ : काल्व्हिन कूलिज - अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ जुलै १८७२)
१९४३ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर - अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (जन्म: १ फेब्रुवारी १८६४)
१९५९ : ला मैसूर चे महाराजा मिर्ज़ा इस्माइल यांचे निधन.
१९७१ : भारतीय जादुगार पी. सी. सरकार यांचे निधन.
१९८२ : सी. रामचंद्र - संगीतकार (जन्म: १२ जानेवारी १९१८)
१९९० : रमेश बहल - चित्रपट निर्माते व दिग्दर्शक.
१९९२ : दत्तात्रय गणेश गोडसे - इतिहासकार, नाटककार, कलादिग्दर्शक, वेशभूषाकार आणि नेपथ्यकार (जन्म: ३ जुलै १९१४)
२००३ : गोपालदास पानसे - पखवाजवादक

## थोडक्यात



### उपळी हायस्कूल उपळीमध्ये बालिका दिन उत्साहामध्ये साजरा

उपळी : वडवणी तालुक्यातील दिनांक ३ जानेवारी रोजी हायस्कूलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री भागवतराव बडे सर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले यावेळी शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषा करून त्यांचे विचार मांडले यावेळी मुलींनी बोलताना म्हणाले की सावित्रीबाई फुले या कालखंडामध्ये शिक्षिका होत्या त्यावेळेस किती हाल अपेक्षा त्यांनी सहन करून आपल्यासारख्या गोरगरीब मुलींना शिक्षण मिळावे यासाठी पुण्यातील भिडे वाड्यामध्ये शाळा काढल्या त्यावेळेस सुद्धा मुली शाळेत जात होत्या आता सुद्धा आपण सर्वजणींनी बाकीचे काम सोडून सतत शाळेत हजर राहणे गरजेचे आहे या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख प्रकाश गोरे सर यांनी केले या कार्यक्रमास शाळेतील सहशिक्षिका श्रीमती सुनिता गायसमुद्र श्रीमती परवीन बाजी शेख श्रीमती प्रज्ञा सौदरमल यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडे अक्षरा व बडे वैष्णवी शेख आणि घुले आकांक्षा यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले

### जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे खांडेकर यांच्या हस्ते उद्घाटन



अंबड : अंबड येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन जालना महानगरपालिका चे आयुक्त श्री संतोष खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले . जालना महानगरपालिका व सर्व नगरपालिका व नगरपंचायत क्रीडा स्पर्धाच्या आज अंबड येथे उद्घाटन करण्यात आले यावेळी मा.आयुक्त संतोष खांडेकर, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, डीपी ओ श्री दीपक इंगोले, केशव कानपुडे ,मुख्याधिकारी डॉ. मनोज उकीर्डे यांच्यासह आदी मुख्य अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.क्रिकेटच्या सामन्यापासून सुरुवात करण्यात आली सदर क्रिकेट स्पर्धा ३ जानेवारी ते ७ जानेवारी पर्यंत चालणार आहेत.

### देवीदास गोहाडे यांचे निधन



अंबड: घनसावंगी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोहेकाँ. देवीदास श्रीहरी गोहाडे यांचे गुरुवारी मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अंबड येथे दुःखद निधन झाले आहे. त्यांचे वय ५२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्यावर मूळगावी गरोळ्याची वाडी (जिल्हा हिंगोली) येथे अंत्यसंस्कार करण्यात आला आहे. घनसावंगी पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेले देविदास गोहाडे हे अंबड येथील पोलीस वसाहतीत राहत होते. त्यांना मध्यरात्री हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना तातडीने अंबड येथील खाजगी आणि उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले होते. उपचार सुरू असतानाच त्यांचं दुर्दैवी निधन झाले. कदीम जालना पोलीस ठाण्यातील पोकाँ. उमेश साबळे यांचे ते भावोजी होते.

### गोविंद कदम यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती



पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील जरेवाडी शाळेचे आदर्श मुख्याध्यापक तथा अंमळनेर येथील रहिवासी गोविंद पांडुरंग कदम यांची पाटोदा पंचायत समिती शिक्षण विभाग येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झालेली आहे.त्यांच्या पदोन्नतीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. गोविंद कदम सर यांनी जरेवाडी, पिंपळवंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट कर्तव्य बजावलेले आहे. शिस्तप्रिय व विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून कदम सर यांनी शिक्षण क्षेत्रात ठसा उमटविला आहे.कदम सर यांनी अंमळनेर,गोमळवाडा,जाटनांदुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतही यशस्वीपणे सेवा करून शैक्षणिक कर्तव्य बजावलेले आहे. गोविंद कदम सर यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाल्याने अंमळनेरचे नाव देखील नावलौकिक झाले आहे.याबद्दल त्यांचा ठिकठिकाणी व परिसरातील शाळेत सत्कार होत आहेत.त्याप्रमाणे त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### ऊसतोड कामगारांच्या समस्यावर संशोधन

धारूर : धारुर तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या समस्या व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या अडचणी जाणून घेण्यासाठी कोकण कला व शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद कुबल व त्यांच्या टीमने जिल्हा परिषद असोला शाळेला भेट दिली. ऊस तोड कामगाराचे स्थानीक मुलाशी संपर्क साधून सविस्तर पणे चर्चा केली कोकण कला व शिक्षण सस्थेच्या पथकाने तालूक्यातील जि प प्राथमीक शाळा आसोला येथे भेट देऊन शाळेतील ऊस तोड कामगाराचे मुलाशी संवाद साधला या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सदाशीव थोरात यांनीसंस्थेचे अध्यक्ष दयानंद कुबल यांचे पारंपरिक बाजरीची भाकरी देऊन स्वागत केले. यावेळी शाळेतील मुले हंगामी वसतिगृहात जेवत असताना कुबल यांनी या संकल्पनेची माहिती घेतली व ऊसतोड मजुरांच्या मुलांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. टीमने घाटेवाडी, कोरेगाव, असोला, गोपाळपूर, सालेगाव या गावांना भेटी देत ऊसतोड मजुरांशी थेट संवाद साधला. त्यांच्या राहणीमान, रोजगाराच्या अडचणी, शिक्षणातील अडथळे यावर चर्चा करण्यात आली. या उपक्रमात युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे कार्यकारी सचिव एच पी देशमुख, प्रशासनिक - संतोष रेपे, प्रकाश काळे, सुनिता विभूते, संभाजी वळसे आदींचा सहभाग होता. या संवादातून ऊसतोड मजुरांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी नवी धोरणे राबविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे

# विकास कामासाठी तातडीने सर्वेक्षण करून अंदाजपत्रके सादर करा -आ. खोतकर

जालना । प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदारसंघातील रस्ते व इतर विकासाचे कामे तातडीने हाती घेण्यासाठी मतदारसंघातील रस्त्याचे व इतर कामाचे सर्वेक्षण करून शासनाच्या विविध योजनेमधून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत अशा स्वरूपाच्या सूचना शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या. आज दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी आमदार खोतकर यांनी त्यांच्या निवासस्थानी सार्वजनिक बांधकाम विभागाची आढावा बैठक घेतली या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे ,अधीक्षक अभियंता एस. एस. भगत ,उपाभियंता सूर्यवंशी, बांधकाम अभियंता चंद्रशेखर नागरे यांच्यासह अनिरुद्ध खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,संजय खोतकर, भाऊसाहेब घुगे,महानगर प्रमुख विष्णू पाचफुले, राहुल हिवराळे, यांची उपस्थिती होती.



बैठकीमध्ये आमदार खोतकर यांनी सांगितले की जालना मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे गेल्या पाच वर्षात या रस्त्याची साधी दुरुस्ती करण्यात आलेली नाही यामध्ये प्रामुख्याने पोखरी-नाव्हा -बाजीउबरद - शेवली रस्ता ,भाटेपुरी -रामनगर -मानेगाव- मोतीगव्हाण रस्ता , वडगाव -सोमनाथ साळेगाव -वानडगाव रस्ता, गोलापांगरी बठाण- हिस्वन- माली पिंपळगाव कार्ला या प्रमुख रस्त्याचीत्याचीरुंदीकरण व सुधारणा ची कामे हाती घेण्यासाठी सीआरएफ मधुन प्रस्ताव तयार करावा व जालना -दरेगाव, जालना- सिरसवाडी रस्त्याचे तसेच मतदार संघातील प्रमुख जिल्हा मार्ग ,इतर जिल्हा मार्ग ,ग्रामीण रस्ते यांच्या देखील संरक्षण शासनाच्या नाबार्ड अर्थसंकल्प एस आर सारख्या विविध योजनांमधून मंजूर करून घेण्यासाठीप्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावेत. तसेच जालना शहर महानगरपालिका देखील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे परंतु महानगरपालिकेला हस्तांतरित न झालेले रस्त्याची देखील तातडीने प्रस्ताव सादर करावेत यामध्ये प्रामुख्याने जिजामाता प्रवेशद्वार ते नावा चौफुली रिंग रोड पर्यंत रस्त्याचा चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात यावा. तसेच जालना जिल्ह्यासाठी मंजूर असलेले शासकीय मनोरुग्णालयाचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना देखील या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.

तसेच जालना शहरांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुरू असलेल्या शासकीय कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामे अत्यंत संत गतीने सुरू आहेत ते तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.यामध्ये प्रामुख्याने अन्न औषधी प्रशासन इमारत बांधकाम ,उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय बांधकाम, कृषी विभागाची इमारत बांधकाम, वजन मापे बिल्डिंग बांधकाम ,दुय्यम निबंधक (रजिस्ट्री कार्यालय) बांधकाम इत्यादीचा समावेश आहे. त्याचप्रमाणे जालना शहरातील विविध पोलीस कॉर्टर व शासकीय कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाची त्या विभागातील रस्ते नाल्यांची अवस्था अत्यंत दैनीय झालेली आहे ती तातडीने दुरुस्त होणे गरजेचे आहे या दृष्टीने पावले उचलावीत व त्वरित सर्वेक्षण करून अंदाजपत्रके मंजूरीसाठी शासनाकडे सादर करावीत. आपण या संदर्भात मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांची भेट घेऊन ही कामे मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असेआ. अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

## अंत:करण शुद्ध होणे हा अध्यात्माचा उद्देश-मराडे

बीड। प्रतिनिधी

देव देव करणे, परमार्थिक होणे, अध्यात्मिक मार्गाचा अवलंब करणे या सर्वांचा एकच अर्थ होतो तो म्हणजे माणसाने आतून आणि बाहेरून शुद्ध होणे. अंत:करण शुद्ध होणे हा अध्यात्माचा सर्वोच्च उद्देश असल्याचे प्रतिपादन तळेगाव येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिराचे संस्थापक परशुराम महाराज मराडे यांनी केले. बीड येथील ऐतिहासिक शनी मंदिरामध्ये शनी जन्मोत्सवानिमित्त आयोजित कीर्तनामध्ये ते बोलत होते. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या 'आता तरी पुढे हाचि उपदेश नका करू नाश आयुष्याचा' हा अभंग घेतला होता.

पुढे बोलताना ते म्हणाले की, 'आत्तापर्यंत माणसाच्या जीवनात ज्या चुका झालेल्या आहेत त्याकडे जास्त लक्ष न देता मनुष्याने इथून पुढे चांगल्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. विविध प्रकारचे व्यसनं, वाईट सवयी सोडून दिले पाहिजेत. माणसाला देवाने शंभर वर्षाचे आयुष्य दिलेले आहे. ते आपण चांगल्या कामांसाठी वापरले पाहिजे. पुण्य या शब्दाचा अर्थ परोपकार आहे तर पाप या शब्दाचा अर्थ परपीडा आहे. देव म्हणजे वेगळं काही नाही, जगामध्ये जी जी गोष्ट चांगली आहे ती प्रत्येक गोष्ट ईश्वर आहे. एकमेकांशी प्रेमाने राहा, आपल्या कुटुंबातील सदस्यांची प्रेमाने वागा, आपल्या सहवासात असलेल्या प्रत्येकावर माया करा असे उपदेशही त्यांनी यावेळी केले. कीर्तनासाठी त्रिंबक महाराज मातकर, दत्तात्रेय बहिर, संतोष डोंगरे, रमेश जाधव, वैभव काकडे, श्रीकृष्ण उबाळे, विणेकरी वाल्मीक चाटे, मृदंग वादक तेजस मते, शनी महाराज देवस्थानचे अध्यक्ष रामनाथ खोड, व्यवस्थापक आदित्य पायगुडे, विश्वस्त गणेश मस्के यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मूकबधिर शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

नेकनूर । प्रतिनिधी

दि.३ जानेवारी वार शुक्रवार रोजी नेकनूर येथील मूकबधिर शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी कारण्यात आली. कार्यक्रमाच्या वेळी मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तसेच वाचा उपचार तज्ञ श्री तांबिले सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य खूप महान आहे. आज जर हे फुले दांपत्य जन्माला आले नसते आणि ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी जर मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडली नसती तर आज स्त्रिया शिक्षणामुळे डॉक्टर, इंजिनियर, राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या



नसत्या. हो आजही आपल्याला स्त्रिया चूल आणि मूल एवढेच त्यांचे कर्तव्य करताना दिसल्या असत्या. त्यामुळे ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव जयजयकार केला पाहिजे त्यांच्या कार्याची ओळख समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. फुले दांपत्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी जी क्रांतीज्योत पेटवली आहे ती अखंड चालू ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. अशा शब्दात फुले दांपत्याविषयी त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती श्री गिराम सर यांनी आपल्या मनोगत मधून सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री कुलकर्णी सर प्रास्ताविक श्री राखुंडे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार श्री भालेराव सर यांनी मांडले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे शिक्षिका म्हणून उपस्थित असलेल्या श्रीमती खरंगुळे मॅडम श्रीमती लोखंडे मॅडम श्रीमती खराटे मॅडम यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी मूकबधिर मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा पेहराव करून आम्ही मूकबधिरही शिकू शकतो हा सामाजिक संदेश दिला.सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री खारके सर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

## विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी गुरुकुल शिक्षण महत्त्वाचे- डॉ. आदिती सारडा

### आदित्य शिक्षण संस्थेत आदित्य तीर्थात्त शास्त्र गुरुकुलचे आयोजन

बीड :। प्रतिनिधी

भविष्यातील विकसित भारत उभा करण्यासाठी आवश्यक युवा पिढी तयार करणे हे आदित्य शिक्षण संस्थेचे ध्येय आहे. या ध्येयपूर्तीसाठी कार्यकरत असताना उद्याची आयुर्वेद वैद्या ची पिढी ही शुद्ध आयुर्वेद जाणणारी व पूर्ण विश्वासाने आयुर्वेद प्रॅक्टिस करणारी घडावी ही दूरदृष्टी मनात ठेवून आदित्य शिक्षण संस्थेत आदित्य तीर्थात्त शास्त्र गुरुकुलचे आयोजन ५ ते १३ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. असल्याची माहिती वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी दिली.या कार्यक्रमाचे उद्घाटन आयुर्वेद व्यासपीठाचे प्रांत सहकार्यवाह सुप्रसिद्ध वैद्य. परेश देशमुख छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभ हस्ते होणार आहे.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. या गुरुकुलाचे उद्घाटन आयुर्वेद व्यासपीठाचे प्रांत सहकार्यवाह सुप्रसिद्ध वैद्य. परेश देशमुख छ. संभाजीनगर यांच्या शुभ हस्ते होणार आहे. या उदघाटन प्रसंगी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य. डॉ विवेक वसंतराव कुलकर्णी यांच्यासह सर्व अध्यापकवृंद उपस्थित असणार आहे. या गुरुकला मध्ये आयुर्वेदिय प्राचीन समिता, चरण समिता, सुश्रुत समिता, अष्टांगतहृदय, अष्टांगत संग्रह, आदी ग्रंथांचा अभ्यास केला जाणार आहे. अभ्यास करत असताना ग्रंथ वाचन कसे करायचे त्याचा अर्थ कसे समजायचे तसेच या ग्रंथाचा आजच्या काळानुसार कसा उपयोग होऊ शकतो हे उदाहरणसह शिकवले जाणार आहे. तसेच हे शिकत असताना सामाजिक मूल्य कशी जपावीत तसेच सहजीवन कसे जगावे यासंबंधीचे शिक्षण सहज संस्कारीत होणार आहेत. गुरुकुलाचे अधिक वैशिष्ठ म्हणजे हे होणारे भावी डॉक्टर स्वतःची सर्व कामे स्वतःच करणार आहेत. गुरुकुलच्या दिनचर्येची सुरुवात पहाटे पाच वाजता योग प्राणायाम होणार आहे. विद्यार्थ्यांना मोबाईल मुक्त वातावरणात ठेवण्यात येणार आहे. दिवसभर विविध कार्यशाळा, अध्यापन सत्र, दिग्गज वैद्यांचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्या कार्यक्रम होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक व विविध कला गुण दर्शनाचे कार्यक्रम होणार आहे. आदित्य गुरुकुलम मध्ये अध्यापन व विविध विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पुणे, नाशिक, अहिल्यानगर, लातूर येथील वैद्य मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये वैद्य. प्रयाग शेठीया, वैद्य. चिन्मय फडके, वैद्य. वेधस कोल्हटकर, वैद्य. प्रदीप पवार, वैद्य. श्रीरंग गलगली, वैद्य. गणेश मलवाडे , वैद्य. स्मिता साठे, वैद्य. मधुरा मिरजकर, वैद्य. धनंजय कुलकर्णी, वैद्य. विभव येवलेकर हे येणार आहेत.

## सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या पंखात शिक्षणाचे बळ दिले : प्रा. डॉ. जावळे

बीड। प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी भारतीय स्त्रियांच्या शिक्षणासाठी फार मोठे कार्य केले आणि आयुष्यभर स्त्री जातीच्या उन्नतीसाठी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यामुळे संपूर्ण स्त्रियांच्या पंखामध्ये शिक्षण रुपी बळ निर्माण झाले त्यामुळे भारतीय स्त्री विकासाच्या मुख्य प्रवाहात यशस्वीपणे वाटचाल करत आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध इतिहास अभ्यासक प्रा . डॉ.बाळासाहेब जावळे यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था () पुणे मान्यताप्राप्त सम्राट प्रतिष्ठान उमरद खालसा संचलित छत्रपती राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र बीड येथील निःशुल्क दिल्या जात असलेल्या सैनिकी आणि पोलीस प्रशिक्षणामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते असे म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थात साऊ म्हणजे महाराष्ट्राच्या स्त्री मुक्तीची वाटसरू , ज्यांनी महाराष्ट्राला क्रांतीकारी विचार दिला आणि भारतीय भगिनीला ज्ञानामृत पाजले. भारतीय समाजघरात जातपितृसत्तेचा कडेकोट पहारा असलेल्या कालखंडात सावित्रीबाईचा जन्म झाला . साऊ आणि ज्योतिरांवानी शाळा काढल्या परंतु शाळाची जाळी विणीत ते बसले नाहीत . शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे . केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यायचे नव्हते तर शिक्षणातून स्वत: सोबत जग बदलु पहाणारा समाज त्यांना अपेक्षित होता. तो सुशिक्षित समाज निर्माण करणारी स्त्री त्यांना घडवायची होती. त्यांनी 'माणूस घडविणारी शाळा' निर्माण केली. त्यामुळेच माणसाला माणुस म्हणून जगण्याचे आत्मभान आणि बळ प्राप्त झाले.

समाजमन आज ही विधवा ,परित्यक्ता स्त्रीयांना समता देण्यास अनुकूल नाही .मात्र अशा स्त्रीयाचा प्रश्न सोडवण्याचे धाडस सावित्रीबाईंनी दाखवले. स्वत :च्या राहत्या घरात स्वत : ची मिळकत स्वत : च्या खर्चापुरेशी नसतांनाही ' बालहत्या प्रतिबंधक गृह ' सुरू केले . समाजाप्रती असलेली त्यांची बांधीलकी आणि योगदान इतके मोठे आहे की आज आपण आधुनिक भारतीय मानवी समाजाच्या प्रगतीचा इतिहास सावित्री - ज्योतिरावां शिवाय पुर्णच करू शकत नाहीत . आपण त्यांचे कायमपणे ऋणी आहोत . कारण त्यांनी व्यवस्थे विरूध्द आणि सत्ताशोषण परंपरेविरूध्द उभे राहण्याचे धाडस आपणाला दिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीधर आघाव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भरत खेत्रे यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख प्रा. अविनाश वडमारे यांनी मानले. यावेळी ग्रंथपाल श्री सचिन काकडे, श्री दिलीप गायकवाड आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

बीड/प्रतिनिधी

माहेश्वरी, राजस्थानी समाजातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या महेश सेवा संघ व श्री युवा माहेश्वरी सेवाभावी संस्था यांनी आपल्या सदस्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नूतन वर्षात सामाजिक कार्याची सुरुवात म्हणून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन आज रविवार दिनांक ०५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत विप्रनगर,पेठ बीड येथील वरद गणेश मंदिरात केले आहे. सदरील शिबिरात संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व डॉक्टर संकेत बाहेती यांच्या माध्यमातून हाडांची मोफत तपासणी हा कॅम्प देखील आयोजित केलेला आहे. महेश सेवा संघ गेल्या ३२ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे. मंडळाचे मार्गदर्शक कै. रामप्रसादजी राठी, स्व. जयनारायणजी मालपाणी तसेच मंडळाचे सदस्य स्व. दीपकजी चितलांगे, स्व. जयप्रकाशजी बियाणी, स्व. दिलीपजी सोहनी, स्व. रमेशजी चरखा, स्व. गणेशजी लड्डा या दिवंगत सहकार्यांनी मंडळाच्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्य केले आहे.. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळाने रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आहे.

# वडवणीत शाकंभरी पौर्णिमेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी शहरामध्ये शाकंभरी पौष पौर्णिमेनिमित्त श्री.श्री.श्री.दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या आशिर्वादाने ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या प्रेरणेतून व ह.भ.प.प्रेममूर्ती नामदेव महाराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि भव्य कीर्तन महोत्सव तथा अखंड हरिनाम सप्ताह याचे आयोजन करण्यात आले असून याचा आरंभ सोमवार दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी होणार असून याची सांगता शाकंभरी पौष पौर्णिमा दिनी सोमवार दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. यादरम्यान विविध धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांची मोठी रेलचेल राहणार असून तरी या अध्यात्मिक पर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सप्ताहामध्ये व किर्तन महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहेत. या उत्सवासाठी गेल्या महिनाभरापासून जय्यत तयारी करण्यात येत आहे. हा महोत्सव दि.६ ते १३ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णूसहस्त्रनामपाठ, ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल. दि.१३ रोजी सकाळी ८ ते १० चौंडेश्वरी मातेची भव्य मिरवणूक निघेल. या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प.भागवत महाराज शिंदे यांचे आहे तर गाथा भजन व काकडा नेतृत्व आणि साथ ह.भ.प.दामू अण्णा गोंडे व समस्त भजनी मंडळी व हरिपाठ नेतृत्व व साथ ह.भ.प.सखाराम महाराज बानेगांवकर यांचे आहे. तर मृदंगाचार्य ह.भ.प.तालमणी वैभव महाराज सावळे, कैवल्य नामदेव लबडे, ज्ञानेश्वर महाराज लोकरे, रंगनाथ महाराज देवकते तर गायनाचार्य अनिरुद्ध महाराज नालेगांवकर, माऊली महाराज घुमरे, माऊली महाराज धारासुरकर, बप्पा महाराज कोठुळे, माऊली महाराज कुटे, आसाराम महाराज आंबुरे, महादेव महाराज जाधव, सखाराम महाराज बानेगांवकर, विष्णू महाराज कोठुळे, पुरुषोत्तम महाराज कोठुळे, विष्णुपंत महाराज निपटे, तात्यासाहेब महाराज मस्के, हरिभाऊ महाराज जाधव, गोपीनाथ महाराज मस्के हे असतील. हा सप्ताह श्री.श्री.श्री.दयानंद पुरी महास्वामीजी व ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने होत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये दररोज दु.४ ते ५ प्रवचन होणार आहे. यात दि.६ रोजी ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके, दि.७ रोजी ह.भ.प.दता महाराज पूनंदगावकर, दि.८ रोजी ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, दि.९ रोजी ह.भ.प.बजरंग महाराज धायरे, दि.१० रोजी ह.भ.प.राजाराम महाराज सूर्यवंशी, दि.११ रोजी ह.भ.प.चंद्रकांत महाराज सातोनेकर, दि.१२ रोजी ह.भ.प.भागवत महाराज शिंदे यांचे प्रवचन आहे. तर या दरम्यान हरी किर्तन दररोज दि.६ रोजी ह.भ.प.केशव महाराज उखळीकर, दि.७ रोजी ह.भ.प.शिवाजी महाराज बावस्कार, दि.८ रोजी ज्ञानसिंधू ह.भ.प.संदिपान महाराज शिंदे, दि.९ रोजी ह.भ.प.सागर महाराज बोराटे, दि.१० रोजी ह.भ.प.रामकृष्ण महाराज लोहगांवकर, दि.११ रोजी ह.भ.प.योगिराज महाराज गोसावी, दि.१२ रोजी ह.भ.प.अनिल महाराज पाटील यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तर सोमवार दि.१३ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत प्रेममूर्ती ह.भ.प.नामदेव महाराज लबडे यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर सार्वजनिक महाप्रसादाची पंगत होणार आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सर्व भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ वडवणीच्या वतीने करण्यात आले आहे.फ

# स्त्रियांचे अंधकारमय आयुष्य सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने प्रकाशमय केले- सुनीता मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्त्रीयांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने शैक्षणिक विश्वाचे द्वार उघडून त्यांचे अंधकारमय आयुष्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने प्रकाशमय केल्याची भावना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुलें महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्या पतसंस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतांना बोलत होत्या. यावेळी पतसंस्थेच्या संचालिका श्रीमती शोभा खडकभावी, सुरेखा खंडाळे, सविता रापतवार , अंजली मस्के तसेच उषा मसने या उपस्थित होत्या. कार्यक्रमात सर्वप्रथम ज्ञानाई क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सावित्रीमाईच्या जीवनावर प्रकाश टाकताना पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी सांगितले की देशातील महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना शिक्षण रुपी पंख देण्याचे पवित्र कार्य क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी केले. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची भारताच्या इतिहासावर अमीट छाप आहे . क्रांतीज्योती सावित्रीमाई यांनी दिन , दलित , शोषित महिलांसाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील शिक्षणाचे द्वार खुले केले. त्यांना शैक्षणिक बळ देण्याचे श्रेय माता सावित्रीमाई फुले यांनाच जाते . अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाचा प्रारंभ करण्याचे



ज्ञानाई सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेच्या वतीने विनम्र अभिवादन

धाडस ज्योतिबा फुले यांच्या सहकार्याने सावित्रीमाई फुले यांनी दाखवले . सावित्रीबाई यांचा आदर्श समोर ठेवूनच आजची नारी समाजात वावरताना दिसत असल्याचे सुनीता राजकिशोर मोदी यांनी सांगितले .

क्रांतीज्योती सवित्रीमाई फुले यांनी त्या काळातील मुली , महिला यांना चूल आणि मूल या जोखडाच्या चौकटीतुन बाहेर काढण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. यासाठी त्यांना आपल्याच समाजाकडून अनेक संकटांना सामोरे जावे लागले. मात्र सावित्रीमाईंनी येणाऱ्या संकटांना धैर्याने सामोरे जाऊन स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यांच्याच शिकवणी व आदर्शांना समोर ठेवूनच आपणही आपले कार्य करण्याचे आवाहन श्रीमती सुनीता मोदी यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी पतसंस्थेच्या संचालिका सुरेखा खंडाळे यांनी देखील सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपट उलगडला. जेव्हा सावित्रीबाई फुले यांनी हातात पुस्तक घेऊन शाळेकडे जात असताना मनुवाद्यांनी सावित्रीबाई यांच्या अंगावर चिखल, शेण फेकून कुत्सित भावनेने पाहिले. त्याच्यावर दगडफेक देखील करण्यात आली. मात्र अशाही परिस्थितीत सावित्रीबाई या डगमगल्या नाहीत. मला माझ्या आया बहिणींना या कर्मठ दुनियेतुन बाहेर काढून त्यांना शिक्षित करण्याचा चंग बांधला होता.त्यांना याकामी महात्मा ज्योतिबा फुले यांची मोलाची साथ मिळाल्याचे श्रीमती सुरेखा खंडाळे यांनी याप्रसंगी नमूद केले. याप्रसंगी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट चे व्यवस्थापक संतोष ढगे आणि सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक सागर कंगळे हे उपस्थित होते.

## सुवर्णपदक विजेता धावपटू अनिकेत खंडागळेसह पालकांचा काँग्रेसच्यावतीने सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

नेपाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या इंडियन नेपाळ इंटरनॅशनल युवा सिरीज २०२४-२५ या स्पर्धेमध्ये शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या मालीपारगावचे सुपुत्र अनिकेत बाजीराव खंडागळे याने ४०० मीटर धावणे मध्ये सुवर्णपदक पटकावले होते.

अतिशय बिकट परस्तिथीवर मात करून आई वडील या दोघांनी मोठ्या हिमतीने सुवर्णपदक विजेता धावपट्टू अनिकेत खंडागळे



याला धावणे या खेळ प्रकारात विविध स्वरूपाचे बळ दिलं असल्यामुळे आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी हे श्रय आई वडील यांना देत खऱ्या सन्मानाचे हकदार पालक असे मानून भारतीय काँग्रेस पक्ष्याच्या वतीने अंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेता धावपट्टू अनिकेत खंडागळे यांच्या पालकांचा सपतनिक गुलाबपुष्पहार, मानाचा शेला, घालून पेढे भरवत सत्कार करून सन्मान केला. तसेच समाज बांधवांनी आत्ता शिक्षणाला खेळाची जोड देत आपल्या पाल्यांना खेळाच्या माध्यमातून हल्लीच्या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी समाजाला उद्देशून केले आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विक्रम वाघमारे, मुकुंद हिवाळे, राहुल हिवाळे सह खंडागळे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथील इस्तेमाच्या समारोप दुवा प्रसंगी धनंजय मुंडेंची उपस्थिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे मुस्लिम समाजाच्या इस्तेमाच्या समारोपाच्या दुवाप्रसंगी आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी उपस्थिती लावली.

यावेळी धनंजय मुंडे यांनी समारोपाच्या दुवाप्रसंगी उपस्थित मुस्लिम समाज बांधवांशी तसेच विविध धर्मगुरूंशी संवाद साधत इस्तेमाच्या समारोप प्रसंगाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व मुस्लिम समाजबांधव मोठ्या



मुस्लिम बांधवांशी संवाद साधत दिल्या शुभेच्छा

प्रमाणात उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे यांचे केले सांत्वन दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अंबाजोगाई चे तालुकाध्यक्ष राजेभाऊ औताडे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले असून धनंजय मुंडे यांनी सेलू आंबा येथील राजाभाऊ अवताडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन औताडे कुटुंबीयांचे संतन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, शिवाजीराव शिरसाट, विलास बापू मोरे, विलास काका सोनवणे, अजित गरड, रणजित लोमटे, तानाजी देशमुख, गणेश देशमुख, राजाभाऊ पौळ, प्रवीण जगताप, बंडू शिंदे, शरद शिंदे, रामलिंग चव्हाण, लिंब्राज धुमाळ, धर्मराज पाटील, विठ्ठल कोकरे यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## गजानन विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची जयंती साजरी

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाानी प्राचार्य केशव भांगे हे होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्रथम क्रांतज्योती सावित्रीबाई फुलेंच्या



प्रतिमेचे पुजन प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस.,

◀◀ पान ३ वर

## बागुल क्लिनिकचे आ.हिकमत उढाण यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड येथे सुरू असलेले बागुल क्लिनिकचे स्थलांतर व नूतनीकरण चे उद्घाटन नवीन वर्षानिमित्त दि १ जानेवारी रोजी उदघाटक म्हणूनआमदार हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी,सुदाम बाप्पा मुकणे,केदार दादा कुलकर्णी, विष्णू महाराज गुरव,डॉ. ज्ञानेश्वर दिवटे,उद्धव नाना मरकड, अनिल दादा सानप, गंगाधर घुले सर, डॉ. ज्ञानदेव जानराव, डॉ. कृष्णकुमार कांबळे,पोलीस उपनिरीक्षक अनिल गायकवाड,बळीराम राऊत, दिगंबर उगले, धनंजय खंदारे, विश्वजीत जगताप, गजानन कोकाटे , संजय खोरे, गोधाजी कापसे,अशोक शहा, बाबासाहेब गोंटे, संतोष जिगे , विठ्ठल धाईत,मुस्तकीम पटेल,डॉ. अनिल वाघमारे,डॉ.अभय जाधव, डॉ. तलवाडकर,शिवाजी बजाज, डॉ. योगेश ढेंबरे, पांडुरंग शिंदे,सूत्रसंचालन ऍड. कृष्णा शर्मा यांनी केले तसेच आभारप्रदर्शन प्रा. उज्वला खोब्रागडे यांनी केले. आता नवीन स्थलांतर मालपाणी कॉम्प्लेक्स शांताई हॉस्पिटल समोर कोर्ट रोड अंबड येथे झाले आहे

## जय भारती प्रतिष्ठाणच्या अंबाजोगाई भूषण पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक अमर हबीब सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जय भारती बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान घाटनांदुर यांच्या वतीने दिला जाणारा अंबाजोगाई भूषण पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ पत्रकार ,साहित्यिक व शेतकरी चळवळीचे नेते अमर हबीब काका यांना महाराष्ट्र गोवा वकील परिषदेचे माजी चेअरमन तथा सलग पाच वेळा महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे राहिलेले सदस्य व तसेच माननीय उच्च



न्यायालय खंडपीठ औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठविधीज्ञ ॲड वसंतरावजी साळुंखे साहेब यांच्या शुभहस्ते देण्यात आला.. जय भारती बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान यांच्यावतीने दर तीन वर्षाला अंबाजोगाई भूषण पुरस्कार देण्यात येतो. प्रथम पुरस्कार अंबाजोगाई येथील

◀◀ पान ३ वर

## लिंबागणेश येथे गतिरोधकासाठी ठिय्या आंदोलन

### तहसीलदार शेळकेंच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे - डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते



डॉ.गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर व ग्रामस्थांनी आक्रमक होत भालचंद्र विद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. याच राज्य मार्गावर येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून एचपीएम कंपनीने गतिरोधक बसवलेले

◀◀ पान ३ वर

## बसच्या महिला वाहकाने महिला व मुलीसह बायपासवर बसमधून उतरविले

चौसाळा । प्रतिनिधी

बीड ते सोलापूर या बसने प्रवास करणाऱ्या एका महिलेस व तिच्या मुलीस नियोजित ठिकाणी बस स्थानक वर उतरण्या ऐवजी चक्क ३ किलोमीरवरील बायपास वर रात्री ७सुमारास बस मधून उतरविले. सदर उध्दट चालक वाहक याच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तक्रार धारक महिलेने परिवहन अधिकारी यांच्या कडे केले आहे

सदर प्रकरणी माहिती अशी की दि.०१/०१/२०२५ रोजी बीड ते सोलापूर ही सोलापूर आगाराची इलेक्ट्रॉनिक बस क्र. ०७०६ ही बस बीड येथून निघाली असता सदर बस मध्ये चौसाळ जाण्या करता ७ प्रवाशी बसले त्यामधे १ महीला तिच्या मुलीसह ७ प्रवाश्यांना बस महीला वाहकाने तिकीट हि दिले सदर बस च्या वाहक चालकाने चौसाळा बस स्थानकात जाणार नाही असे सांगून सर्व प्रवाशांना संध्याकाळच्या वेळेस बायपास येथे उतरविले या प्रवाशांनी सदर महिलेस आपण दिलेले तिकीट हे चौसाळा बस स्थानकाचे असताना तुम्ही आम्हाला बायपास येथे रात्रीच्या वेळेस कसे काय उतरविता असे विचारणा केली असता तुम्ही कुठे तक्रार करायची तिथे करा असे उत्तर त्यांच्याकडून आले सदर प्रकरणी महीला प्रवाशी नी या प्रकरणी मा. विभागीय परिवहन अधिकारी मुबई याच्या कडे तक्रार

◀◀ पान ३ वर

# चिंचवन येथे मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी

## राज्यातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार, गायनाचार्य, मृदंगाचार्य यांची लाभणार हजेरी

**वडवणी । प्रतिनिधी**

**पवनपुत्र हनुमानाचे चिरंजीव असलेले मकरध्वज महाराज यांचे जगातील एकमेव मंदिर भारत देशात बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील चिंचवण येथे आहे. अहिरावण महिरावण राक्षसाने याच ठिकाणी राम लक्ष्मणाला लपवून ठेवले होते आणि याच ठिकाणावरून हनुमंताने मकरध्वजासोबत युद्ध करून त्यांची सोडवणूक करून घेतली होती. रामायण काळातील मंकावती नगरी असलेले आजचे वडवणी तालुक्यातील चिंचवन या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य दिव्य मकरध्वज जन्मोत्सव सोहळा येत्या पौष पौर्णिमेला साजरा होत आहे. या सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह होणार असून या सोहळ्यात राज्यातील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, गायनाचार्य, वादणाचार्यांची हजेरी लाभणार आहे. भाविकांसाठी हा एक सुंदर मेळावा असणार आहे. या सोहळ्याचा लाभ बीड जिल्ह्यातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन चिंचवण गावकऱ्यांनी केले आहे.**





रामायण ग्रंथामध्ये राम, लक्ष्मणाला अहिरावण महिरावण नावाचे राक्षस भुयारामध्ये घेऊन जातात. राम लक्ष्मणाचा शोध घेण्यासाठी हनुमान त्या भुयारात शिरतात. भुयाराच्या प्रवेशद्वारावर हनुमंत आणि त्यांचा मुलगा मकरध्वज यांचे घनघोर युद्ध होतं. युद्धामध्ये चर्चा केल्यानंतर पिता-पुत्र असल्याचा परिचय होतो. त्यानंतर हनुमान अहिरावण महिरावणाचा वध करतात आणि राम लक्ष्मणाची सोडवणूक करतात. रामायण काळातील ती मंकावती नगरी म्हणजे आजचे बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील चिंचवन नगरी होय. याच ठिकाणी देवी मंकावतीचे मंदिर आहे. आणि जगातील एकमेव मकरध्वजाचे मंदिर देखील या चिंचवन नगरीत आहे. संत भगवान बाबांनी या ठिकाणी धार्मिक उत्सव सुरू केला. भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि मकरध्वज जन्मोत्सव सोहळा तेव्हापासून सुरू आहे .आज या सोहळ्याला ६४ वर्ष पूर्ण होत आहेत. संत भगवान बाबा नंतर भीमसेन बाबा यांनी देखील या सोहळ्यामध्ये हजेरी लावली गावकरी मोठ्या आनंदान हा सोहळा साजरा करतात .दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ६ जानेवारी ते १३ जानेवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सहा जानेवारी रोजी श्री क्षेत्र चाकरवाडी येथील तपोनिधी महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात होणार आहे .या सोहळ्यात गाथा भजन नेतृत्व पुरुषोत्तम महाराज कोठुळे तर ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व जीवन महाराज तांबडे हे करणार आहेत. या सोहळ्यात राज्यातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तने प्रवचने गायन वादन होणार आहे. या सोहळ्यासाठी सर्व गावकरी आपापले कामे सोडून सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. बीड जिल्हा आणि राज्यभरातील भाविकांनी येत्या पौष पौर्णिमेला या ठिकाणी उपस्थित राहावे तसेच आठ दिवस कीर्तन आणि प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन चिंचवण गावकऱ्यांनी केले आहे.

### या महाराजांची होणार कीर्तने

मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्यात दिनांक ६ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान रात्री आठ ते दहा या वेळेत ६ रोजी जेऊर येथील ह. भ. प. अक्षय महाराज उगले, ७ रोजी तुकोबाराय पावन धाम संस्था संभाजीनगर येथील ह. भ. प. महादेव महाराज बोराडे शास्त्री ८ रोजी परळी येथील हभप भरत महाराज जोगी ९ रोजी परळी येथील हभप तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, १० रोजी टाकळी येथील ह भ प केशवराव महाराज घुले शास्त्री, ११ रोजी नाशिक येथील हभप अनिल महाराज तुपे, १२ रोजी सिद्धेश्वर महाराज संस्थान शिरूर कासार येथील ह भ प विवेकानंद महाराज शास्त्री तसेच १३ जानेवारी रोजी पौष्य पौर्णिमेनिमित्त या सप्ताहाचे काल्याचे किर्तन सकाळी अकरा वाजता महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड यांचे होईल. दिनांक १४ जानेवारी रोजी संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत राज्यातील नामवंत कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज कोठुळे यांचे कीर्तन व त्यानंतर नंदकिशोर बाबासाहेब बडे पाटील व श्रीमंत संतराम बडे, पुरुषोत्तम भागवत तांबडे यांच्यातर्फे महाप्रसाद होणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार, दि.५ जानेवारी २०२५ । पान ७

# दैनिक राज्य लोकतंत्रच्या विधीज्ञ रोजनिशीचा अनावरण सोहळा पुणे जिल्हा सत्र न्यायालयात थाटात संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

दैनिक राज्य लोकतंत्र आणि बार असोसिएशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजीनगर कोर्ट येथे दैनिक राज्य लोकतंत्र चे विधीज्ञ रोजनिशीचे प्रकाशन व वकील बांधवांसाठी वार्षिक डायरी वाटप कार्यक्रम घेण्यात आला. निवडणूक कमिटी अध्यक्ष ॲडव्होकेट. गिरीश शेडगे व पुणे ॲडव्होकेट बार असोसिएशन यांच्या हस्ते डायरी प्रकाशनाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी ॲड. संतोष खामकर, ॲड.कुमार पायगुडे, ॲड.पवन कुलकर्णी, ॲड.मकरंद, ॲड.चेतन हेरपले, ॲड.श्रद्धा कदम, ॲड.शाईन पठाण, ॲड.अक्षय शितोळे, ॲड.रोहित गुजर,





ॲड.तेजवंती कापले, ॲड.विजयराज देवकर, ॲड.सुप्रिया कोठारी, ॲड.प्रवीण, ॲड.कादंबरी दौंड, ॲड.प्रभाकर सोनवणे, ॲड.विकास उंडरे, ॲड.अतुल पाटील, ॲड. सचिन गलांडे, ॲड.जगदीश शिंदे, दैनिक राज्य लोकतंत्रच्या कार्यकारी संपादक अनुष्का कोंड्रा, पत्रकार राजेश नागरे, निखिल आहेर उपस्थित होते. दैनिक राज्य लोकतंत्र हे दरवर्षी वकील बांधवांसाठी विधीज्ञ रोजनीशीचे वाटप करीत असतात. डायरी वाटप हा कार्यक्रम पत्रकार आणि वकिलांमध्ये समन्वय साधण्यासाठी आणि वकिलांना दैनंदिन डायरी उपयोगात यावी यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. ॲड.सुप्रिया कोठारी म्हणाल्या, वकिलांसाठी डायरी खूप महत्त्वाची असते. एक प्रकारे वकील जेवण करायचे विसरतील पण आपली डायरी लिहिणे कधी विसरणार नाहीत. डायरीमध्ये दैनंदिन कामाच्या नोंदी ठेवल्या जातात. सध्या कितीही डिजिटलायझेशन झाले असले आणि तरी इलेक्ट्रॉनिक माध्यम उपलब्ध असले तरी पण डायरी ही वकील बांधवांसाठी खूप महत्त्वाची असते. या कार्यक्रमाला वकिल बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. ज्येष्ठांकडून लोकतंत्रच्या उपक्रमाला शुभेच्छाङ्गदै.राज्य लोकतंत्र कडून दरवर्षी वकिल ंधवांसाठी विधिज्ञ डायरी वाटपाचा उपक्रम राविला जातो. यंदाही पुणे येथे हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी ॲड. वसंत कर्जतकर सिव्हिल प्रॅक्टीस, ॲड. हर्षद निंबाळकर क्रिमिनल प्रॅक्टीस, ॲड. सुधीर शहा क्रिमिनल प्रॅक्टीस, ॲड. पी. सत्यनारायण या ज्येष्ठ विधिज्ञांनी दै. राज्य लोकतंत्रचे कौतुक केले आणि विधिज्ञ डायरीच्या उपक्रमास भरभरून शुभेच्छा दिल्या.

# शरद मोहोळच्या टोळीच्या निशाण्यावर कोण? पुण्यातील भाईंचे धाबे दणाणले

पुणे । प्रतिनिधी

गुंड शरद मोहोळच्या खुनाचा बदला घेण्याचा डाव पोलिसांनी शुक्रवारी उधळून लावला. मोहोळ टोळीतील दोघांकडून पोलिसांनी पिस्तूले आणि सात काडतुसे जप्त केली. वर्षाच्या आत कुख्यात गुंड शरद मोहोळ याच्या खुनाचा बदला घेण्याचा रचलेला कट पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने उधळला आहे. दोन पिस्तुलधारी तरुणांना युनिट दोनच्या पथकाकडून ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र नेमका 'गेम' कोणाचा होणार होता हे अद्याप गुलदस्त्यात आहे. दुसरीकडे शहरातील सर्वच टोळ्यांचे म्होरके पोलीस ठाण्याच्या पायऱ्या जीजवत असून, तेही या खुनाच्या बदल्यासाठी दोघांच्या निशाणा कोणावर होता, हे समजण्यासाठी देव पाण्यात ठेवून आहेत. पण तो गुन्हेगारीतील बडा मासा असल्याचे बोलले जात आहे.

संदेश लहू कडू (२४, रा. कोथरूड) आणि शरद शिवाजी मालपोटे (२९ रा. कोथरूड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी खराडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, अमोल सरडे, निखिल जाधव, उज्वल मोकाशी यांच्या पथकाने केली आहे.

# मराठी शाळा स्मार्ट व डिजिटल बनविणे काळाची गरज–संतोष खांडगे

**तळेगाव । प्रतिनिधी**

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा वाढता प्रभाव लक्षात घेता मराठी माध्यमांच्या शाळा स्मार्ट व डिजिटल बनवणे काळाची गरज असल्याचे मत नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाचे सचिव संतोष खांडगे यांनी व्यक्त केले. महिंद्रा एक्सिलो वराळे चाकण यांच्या सी.एस.आर फंडातून येथील ड. पु.वा. परांजपे विद्यामंदिर शाळेमध्ये डिजिटल स्कूल उपक्रमांतर्गत सर्व वर्ग खोल्यांमध्ये बसविण्यात आलेल्या डिजिटल इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड उद्घाटन समारंभ संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संतोष खांडगे बोलत होते.

यावेळी महिंद्रा एक्सिलो वराळे चाकण कंपनीचे संजय सोनकुमार,



लक्ष्मण महाले, प्रसाद पादिर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक सोनबा गोपाळे, यादवेंद्र खळदे, महेशभाई शहा, विनायक अभ्यंकर, अशोक काळोखे, विलास पानसरे, मुख्याध्यापक पांडुरंग पोटे, पर्यवेक्षिका रेखा भेगडे, इंदोरी शाळेचे मुख्याध्यापक रेवाप्पा शितोळे, पैसाफंड प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता लादे, निराली मॅडम, संदिप पानसरे, लक्ष्मण मखर आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना खांडगे म्हणाले की, शिक्षण क्षेत्राची बदलती ध्येय व केंद्रस्थानी असणारा विद्यार्थी वर्ग यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञान यांची ओळख व विविध तंत्र कौशल्य हाताळण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्ययनामध्ये हे स्मार्ट बोर्ड निश्चितच उपयुक्त ठरणार आहेत. यावेळी संजय सोनूकुमार म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये राष्ट्रीय नेत्यांच्या विचारातून साकारलेल्या शिक्षण संकुलामध्ये आम्हाला हे करण्याची संधी मिळाली हे आमचे सद्भाग्य आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पांडुरंग पोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभा काळे व सुवर्णा काळडोके यांनी केले. आभार विद्यालयाच्या पर्यवेक्षिका रेखा भेगडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कार्यकर्त्याचा माणूस म्हणून विचार व्हायला हवा ; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

देशात विचार भिन्नता ही समस्या नाहीये. तर विचार शून्यता ही समस्या आहे. आपली कशा सोबत बांधिलकी आहे, हे लोकांना माहीत असले पाहिजे. पक्षात आणि संघटनेमध्ये कार्यकर्त्यांचा माणुस म्हणून विचार करायला हवा जो केला जात नाही. अलीकडे सत्ता येईल तिकडे नेते पळतात, सत्ता गेली की तिथून दुसरीकडे उड्या मारतात, असे मत केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

मराठा सेवा संघ व युगनायक पुरुषोत्तम खेडेकर अमृत महोत्सव गौरव समिती यांच्या वतीने मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर अमृतमहोत्सवा निमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात गडकरी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा




सेवा संघाचे अध्यक्ष विजय घोगरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, आमदार रेखा खेडेकर, माधवराव पाटील शेळगावकर, ज्येष्ठ कवि इंद्रजित भालेराव, कर्नाटक मधील आमदार डॉ. मारोतराव मुळे, माजी आयपीएस अधिकारी विक्रम बोके, आमादार शंकर जगताप, राजेंद्र पवार, राजेंद्र डूबल आदि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मदन पाटील लिखित 'क्रांतीपुरुष पुरुषोत्तम खेडेकर' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. गडकरी म्हणाले, समाजातील अस्पृश्यता, जातीयता, विषमता संपुष्टात आली पाहिजे. कारण तुमची गुणवत्ताच तुम्हाला श्रेष्ठ बनवते. ज्यामुळे जातपात, भाषा, राज्य आणि पंथाच्या पलीकडे जावून तुम्हाला ओळख मिळते. ही गुणवत्ता ज्ञानातून मिळते. आज जर भारताला विश्वगुरू बनायचे असेल तर ज्ञान महत्त्वाचे आहे. मी माझ्या आई – वडिलानंतर शिवाजी महाराजांना मानतो. कारण प्रत्येक पायंड्यांवर त्यांच्या सारखा आदर्श राजा दुसरा कोणी नाही. ते खर्या अर्थाने सेक्युलर होते. कारण सर्वधर्म समभाव असणारे ते एकमेव राजे होते. खेडेकर म्हणाले, एक शासकीय अधिकारी म्हणून काम करताना आलेल्या अडचणी आणि त्यावर मात करून सामाजिक संघटन वाढविले. नोकरीत असताना तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. प्रत्येकाच्या जीवनामध्ये शुन्य हा असतोच पण त्याला योग्य ठिकाणी बसवता आले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गंगाधर बनबरे यांनी तर सूत्रसंचालन स्नेहा खेडेकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौरभ खेडेकर, प्रशांत धुमाळ, अविनाश मोहिते, संतोष शिंदे, उत्तम कामठे, चंद्रशेखर घाडगे, मनोज गायकवाड, अविनाश घोडके, प्रशांत धुमाळ यांनी केले.

# सीओईपीतील प्रवेशाच्या जागा दुप्पटीने वाढणार

**पुणे । प्रतिनिधी**

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या जागांमध्ये आता दुप्पट वाढ होण्याची चिन्हे आहेत. विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स ण्ड इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि इन्स्ट्रुमेंटेशन ण्ड कंट्रोल इंजिनिअरिंग या विद्याशाखांमधील पदवी अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे (एआयसीटीई) पाठविला आहे. लवकरच या वाढीव जागांना मान्यता देण्यात येईल, अशी माहिती सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष विनायक पै यांनी दिली.

विद्यापीठातर्फे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरूड, कुलसचिव डॉ. दयानंद सोनवणे उपस्थित होते. विद्यापीठात



२०२५–२६ या शैक्षणिक वर्षात कृत्रिम बुद्धीमत्ता आणि मशिन लर्निंगमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच, एआय इन सिग्नल प्रोसेसिंग, एआय इन हेल्थकेअर, एआय ण्ड रोबोटिक्स, इंटेलिजंट कम्युनिकेशन सिस्टिम, मटेरिअल प्रोसेस टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. तर, एम.एस्सी इन अप्लाईड सायकॉलॉजी (प्रवेश क्षमता ३०) हा बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम देखील सुरू केला जाईल, असे पै यांनी सांगितले. डॉ. भिरूड म्हणाले,''नामांकित संस्था आणि उद्योग यांच्या सहकार्यातून क्वांटम कॉम्प्युटिंग, मानसशास्त्र, परदेशी भाषा, ऊर्जा व्यवस्थापन, पर्यावरणीय शाश्वतता, सप्लाय चेन मॅनेजमेंट, एंटरप्राईज रिर्सोस प्लॅनिंग, ग्रिकल्चर ण्ड स्मार्ट फार्मिंग, फायनान्स, अर्थशास्त्र, भारतीय ज्ञान प्रणाली यामध्ये बहुविद्याशाखीय कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणार आहेत.''

# नवले पूल परिसरात वेश्याव्यवसाय; 'त्या' महिलांवर पोलिसांची कारवाई

पुणे । प्रतिनिधी

मुंबई – बंगळुरू बाह्यवळण महामार्गावर असलेल्या नवले पूल परिसरात वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या भागात रस्त्याच्या कडेला उभा राहून या महिला रहदारीस अडथळा तर निर्माण करतातच पण येणाऱ्या–जाणाऱ्यांना हातवारे करून त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. अशा चार महिलांवर सिंहगड रोड पोलिसांनी कारवाई करून गुन्हा नोंदविला आहे.

शहरात स्पा, मसाज सेंटरसोबतच नवले पुल आणि महामार्गावर उभा राहून वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांची मोठी संख्या वाढत आहे. दोन महिन्यांपुर्वीच परिसरात कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर देखील पुन्हा याठिकाणी या महिला उभा राहत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, मागील काही महिन्यांपासून महिला रस्त्यावर उभ्या राहून बेकायदा वेश्या व्यवसाय करीत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. स्थानिक नागरिकांनी अनेकदा याविषयी कारवाईची मागणी केली होती. या महिला रस्त्यावर उभ्या राहून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना अश्लील हावभाव करून खुणावत असल्याच्या आणि त्यामुळे या भागातील महिलांना व मुलींना त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या.

# शारदानगरच्या सुशोभिकरणाला ३० कोटी खर्च होणार–अजित पवार

**माळेगाव । प्रतिनिधी**

बारामती शहरात कॅनॉल लगत आकर्षक झालेले सुशोभिकरणाच्या तुलनेत शासन स्तरावर मंजूर झालेले शारदानगरचे सुशोभिकरण लोकांना हवेहवेसे वाटले पाहिजे. शारदानगरच्या वैभवात भर पडणाऱ्या या विकास प्रकल्पाला आणखी १५ कोटी रुपये मंजूर केले जातील. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी आता एकूण ३० कोटी रुपये खर्च होणार आहेत. अर्थात हे काम होत असताना बारामती–माळेगाव राज्य मार्गाच्या चौपदरीकरणालगत सर्विस रस्ता उभारला जाईल. त्याकामी प्रशासकीय पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्ताव तयार करावा, असा महत्वपुर्ण निर्णय आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहिर केला.

बारामती नगरपरिषद व माळेगाव नगरपंचायत ही दोही शहर तालुक्याच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. अर्थात या शहरांना जोणारा राज्यमार्ग प्रशस्त होणे आवश्यक आहे.तसेच या मार्गावरील शारदानगर शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचे सेंटर बनले आहे. त्या पार्श्वभूमिवर रस्ता व त्या बाजूला होणारे



सुशोभिकरण प्रकल्प जागेची पाहणी करण्यासाठी अजित पवार शारदानगरला आले होते. त्यावेळी उपस्थित अधिकरी व शारदानगरच्या रहिवाशांसी बोलताना अजित पवार यांनी वरील कामी महत्त्वपूर्ण निर्णय जाहिर केले. बारामती व माळेगाव या दोन शहरांमध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवी आणि सेवासुविधांच्या बाबतीतही समन्वय रहावा त्या अर्थाने काम झाले पाहिजे, अशी सूचनाही पवार यांनी केली.

# पुण्यात चोरट्यांचा सुळसुळाट; 'या' भागातून महिलांचे दागिने हिसकावले

**पुणे प्रतिनिधी**

अनेक वर्षानंतर पुन्हा सोनसाखळी चोरटे सक्रिय झाले असून, त्यांनी चांगलाच उच्छाद घातला आहे. शहरात हे चोरटे महिलांना सॉफ्ट टार्गेट करत असून, एकट्या लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच सोनसाखळी चोरीच्या घटना घडल्या आहेत. या घटना पेरणे फाटा परिसरात घडलेल्या असून, १ जानेवारी रोजी विजयस्तंभ येथे अभिवादन करण्यास आलेल्या अनुयायांना चोरट्यांनी यावेळी टार्गेट केले आहे. तर, तुळशीबाग तसेच कात्रजमध्ये देखील सोन साखळी हिसकावल्याच्या दोन घटना घडल्या आहेत. चोरटे शहरात उच्छाद घालत असताना मात्र पोलिसांचे हात मात्र रिकामेच असल्याचे दिसत आहे. दरम्यान, लोणीकंद पोलिसांना या टोळीतील एक चोरटा पकडण्यात यश आले आहे. पण, त्याने चोरलेले दागिने साथीदारांना दिले असल्याचे समोर आले आहे.

पीएमपी बसमध्ये चढत असताना घडल्या घटना

लोणीकंद पोलीस ठाण्यात एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यात पाच जणांच्या गळ्यातील सोन्याची चैन व महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून नेण्यात आले आहे. या सर्व घटना पीएमपीएल बसमध्ये चढत असताना गर्दीत घडल्या आहेत. दुपारी बारा ते चारपर्यंत या घटना घडल्या आहेत. यात चोरट्यांनी ४९ वर्षीय व्यक्तीची ६२ हजारांची सोन साखळी, तीन महिला व एका व्यक्तीच्या गळ्यातील २ लाख ९० हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. चोरट्यांनी



पीएमपीएल बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन या चोऱ्या केल्या आहेत. पेरणे फाटा येथे विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने अनुयायी येत असतात. मोठी गर्दी येथे होते. ह्या गर्दीत चोरट्यांनी गळ्यातील सोनसाखळी हिसकावल्या आहेत. पुढील तपास लोणीकंद पोलीस करत आहेत.

विश्रामबाग पोलिसांत गुन्हा दाखल

तुळशीबागेत खरेदीच्या निमित्ताने आलेल्या महिलेच्या गळयातील ६१ हजारांची सोनसाखळी चोरुन नेल्याची घटना घडली. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांत अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला. याबाबत ५६ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. तक्रारदार महिला नाशिकमधील आहेत. त्या बुधवारी तुळशीबागेत खरेदीसाठी आल्या होत्या. सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास त्या तुळशीबागेतील विक्रेत्याकडून खरेदी करत होत्या. त्यावेळी गर्दीत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील ६१ हजारांची सोनसाखळी चोरुन नेली. पोलीस कर्मचारी जाधव तपास करत आहेत. कोयत्याचा धाक दाखवून लूट, दुकानाचीही केली तोडफोड; शिक्रापुरात नेमकं काय घडलं?

तसेच, कात्रज येथील राजस सोसायटी येथे दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील ७० हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत ३७ वर्षीय महिलेने भारती विद्यापीठ पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारदार मुलीला सोडण्यास सकाळी साडेसहाच्या सुमारास रोडच्या कडेला उभारलेल्या होत्या. स्कूल व्हॅनची वाट पाहत असताना दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले.

# कोयत्याचा धाक दाखवून लूट, दुकानाचीही केली तोडफोड; शिक्रापुरात नेमकं काय घडलं?

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

कारेगाव (ता. शिरुर) येथील चिंतामणी हॉस्पिटल जवळ एका मनी ट्रान्सफरच्या दुकानात चौघांनी कोयत्याने दहशत माजवत दुकानात तोडफोड करत ३५ हजार रुपये चोरुन नेल्याची घटना घडली आहे. रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे प्रथमेश उर्फ बच्चा नवले, आयर्न नवले, ओम पवार व वैभव गाडे या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारेगाव (ता. शिरुर) येथील ज्ञानेश्वर डांगे व ऋषिकेश डांगे हे त्यांच्या मनी ट्रान्सफरच्या दुकानात असताना प्रथमेश नवलेसह तिघेजण दुकानात आले त्यांनी ज्ञानेश्वर व ऋषिकेश यांना शिवीगाळ दमदाटी करत दुकानाचे शटर खाली घेऊन दोघांना कोयत्याचा धाक दाखवत दुकानातील दरवाज्याची काच व फिंगर प्रिंट घेण्याचे डिवाइस मशीन फोडून नुकसान केले. तसेच कोयता दाखवत दुकानातील ३५ हजार रुपये काढून घेत हातातील कोयता फिरवत दहशत माजवत चौघेजण पैसे घेऊन गेले.

याबाबत ज्ञानेश्वर कान्हू डांगे (वय २१ वर्षे रा. सोने सांगवी ता. शिरूर जि. पुणे) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी प्रथमेश उर्फ बच्चा नवले, आयर्न नवले, ओम पवार व वैभव गाडे या चौघांवर गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निळकंठ तिडखे हे करत आहेत.

बारामतीतील कोयता गँगवर अंकुश; थेट केली येरवडा कारागृहात रवानगी

महिलांकडील मोबाइल लंपास

पुणे शहरात दुचाकीस्वार चोरट्यानी धुमाकूळ घातला असून, पादचारी महिलांकडील दागिने तसेच मोबाइल चोरून नेण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसाखाली प्रभात रस्त्यावरील हिरवाई उद्यान येथे दुचाकीस्वार चोरट्यांनी पादचारी महिलेकडील मोबाइल चोरून नेल्याची घटना घडली. नगर रस्त्यावरील वाघोली भागात दुचाकीस्वार महिलेच्या गळ्यातील साडेतीन लाखांचे मंगळसूत्र चोरट्यांनी चोरून नेले, तर हडपसरमध्ये ज्येष्ठ महिलेचे मंगळसूत्र चोरण्याचा प्रयत्न झाला. सातत्याने या घटना घडत असताना पोलिसांना मात्र या चोरट्यांचा थांगपत्ता लागत नसल्याचे वास्तव आहे. याप्रकरणी ५२ वर्षीय महिलेने डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदार महिला प्रभात रस्त्यावरील गल्ली क्रमांक १५ परिसरातील सोसायटीत राहायला आहेत. त्या बुधवारी सायंकाळी प्रभात रस्ता परिसरातील हिरवाई उद्यान परिसरात चालायला गेल्या होत्या. तेथून त्या घरी निघाल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या मोबाइलवर वहिनीचा फोन आला. त्यामुळे त्या मोबाइलवर बोलत पायी चालत असताना गल्ली क्रमांक १५ परिसरातील सिंबायोसिस शाळेसमोर महिलेच्या हातातील २० हजारांचा मोबाइल चोरून दुचाकीस्वार चोरटे पसार झाले. चोरट्यांनी हेल्मेट परिधान केले होते. सहायक पोलीस फौजदार राजेंद्र मारणे तपास करत आहेत.